❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २६५ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

# १ लाख विद्यार्थ्यांसाठी 'एज्युसिटी' उभारणार

## ५ ऑक्टोबरनंतर दुष्काळाचे पंचनामे सुरू करणार असल्याची फडणवीसांची माहिती



■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील दुष्काळी परिस्थिती, नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत परदेशी विद्यापीठांचे आगमन आणि विरोधकांच्या आरोपांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत सविस्तर भाष्य केले. राज्यात ५ ऑक्टोबरनंतर दुष्काळाचे पंचनामे सुरू करून शेतकऱ्यांना 'एनडीआरएफ'ची (NDRF) मदत मिळवून दिली जाईल, अशी मोठी घोषणा त्यांनी केली. तसेच, नवी मुंबईत भव्य 'एज्युसिटी' उभारली जात असून, राहुल गांधी हे अराजकतावादी मानसिकतेतून लोकशाही संस्थांवर आरोप करत असल्याचा घणाघातही त्यांनी केला.

राज्याच्या शैक्षणिक क्षेत्रातील मोठ्या घडामोडीची माहिती देताना फडणवीस म्हणाले की, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत परदेशी विद्यापीठांना भारतात कॅम्पस सुरू करण्याची परवानगी मिळाली आहे. याचाच एक भाग म्हणून 'वेस्टर्न ऑस्ट्रेलिया युनिव्हर्सिटी'सह तब्बल ७ परदेशी विद्यापीठे महाराष्ट्रात येत असून, त्यांच्या कॅम्पसचे नुकतेच उद्घाटन करण्यात आले आहे. नवी मुंबईत एक भव्य 'एज्युसिटी' तयार होत असून, तेथे सुमारे ८० हजार ते १ लाख विद्यार्थी जागतिक दर्जाचे शिक्षण घेऊ शकतील. याशिवाय, मुख्यमंत्री शिष्यवृत्ती योजनेंतर्गत ३ भारतीय विद्यार्थ्यांना १००% शिष्यवृत्ती देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) अध्यक्ष शरद पवार यांनी राज्यातील दुष्काळाबाबत राज्य सरकारला पत्र पाठवले होते. या पत्रावर प्रतिक्रिया देताना फडणवीस म्हणाले की, "राज्य सरकारने यापूर्वीच दुष्काळ निवारणासाठी आवश्यक ती पावले उचलली आहेत. राज्यात कर्जमाफीची अंमलबजावणी सुरू असून, पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याची व्यवस्थाही युद्धपातळीवर केली जात आहे. पावसाळ्याचा हंगाम संपल्यानंतर म्हणजेच ५ ऑक्टोबरनंतर नुकसानीचे पंचनामे केले जातील आणि त्यानंतर एनडीआरएफची मदत मिळवण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल. सरकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही."

### राहुल गांधींवर सडकून टीका

भाजप आणि निवडणूक आयोगावर संगनमत करून पक्ष चोरल्याचा गंभीर आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला होता. या आरोपांचा समाचार घेत देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधींवर कडाडून टीका केली. "स्वतःचा आणि पक्षाचा पराभव लपवण्यासाठीच राहुल गांधी असे बिनबुडाचे आरोप करत आहेत. भारतीय संविधान आणि देशाच्या लोकशाही संस्थांवरून सामान्य जनतेचा विश्वास उडवणे, हाच त्यांच्या अराजकतावादी मानसिकतेचा मुख्य उद्देश आहे," असा पलटवार फडणवीस यांनी केला.

# साखर साठ्यासंदर्भात सरकारचा मोठा निर्णय, नियमांमध्ये केला बदल

■ मुंबई (दै. संध्या)



गेल्या काही दिवसापासून साखरेच्या दरात वाढ होत असल्याचं चित्र आपल्याला पाहायला मिळालं होतं. लोक साखरेच्या वाढत्या किमतींमुळे चिंतेत होते. कारण सणासुदीच्या काळात साखरेचा खप सर्वाधिक असतो. दरम्यान, अशातच एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. साखरेच्या दरात 25 टक्क्यांची घसरण झाली आहे. त्यामुळं ग्राहकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. तसेच सरकारने आता साखर साठा करण्याच्या नियमांमध्ये काही बदल केले आहेत, ज्यामुळे साखरेच्या किमती लवकरच कमी होण्याची शक्यता आहे. सरकारने मोठ्या प्रमाणात साखर खरेदी करणाऱ्यांसाठी साठा करण्याची मर्यादा 15 दिवसांवरून 30 दिवसांपर्यंत वाढवली आहे, मात्र यासाठी अट अशी आहे की अतिरिक्त साखर साठा केवळ आयात केलेल्या साखरेतूनच खरेदी केला जाऊ शकतो. याचा अर्थ असा की, केंद्र सरकारने मोठ्या प्रमाणात साखर वापरणाऱ्या कंपन्यांसाठी साठा करण्याची मर्यादा वाढवली आहे. पूर्वी, अशा कंपन्या केवळ 15 दिवसांसाठीच साखरेचा साठा करू शकत होत्या. आता ही मर्यादा 30 दिवसांपर्यंत वाढवण्यात आली आहे. सरकारने स्पष्ट केले आहे की 15 दिवसांपेक्षा जास्त असलेला कोणताही अतिरिक्त साठा केवळ आयात केलेल्या साखरेतूनच आला पाहिजे.




# परंपरा आणि आधुनिकतेचा समन्वय साधत सांस्कृतिक वारसा जपावा

## उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन : पुणे फेस्टिव्हलच्या ३८ व्या पर्वाचे उपराष्ट्रपतींच्या हस्ते उद्घाटन; मोहन जोशी यांना 'जीवन गौरव' पुरस्कार



■ पुणे (दै. संध्या)

परंपरा आणि आधुनिकता यांचा समन्वय साधत विकासाकडे वाटचाल करताना समृद्ध सांस्कृतिक वारसा, भाषा, कला, परंपरा आणि मूल्यांचे जतन करणे आवश्यक आहे. आधुनिक पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि आर्थिक विकासासोबत सांस्कृतिक मुळांशी नाते दृढ ठेवणे ही विकसित भारताची खरी ओळख आहे, असे प्रतिपादन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केले. श्री गणेश कला-क्रीडा रंगमंच, स्वारगेट येथे पुणे फेस्टिव्हलच्या 38 व्या पर्वाचे उद्घाटन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते झाले. यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार हेमा मालिनी, खासदार डॉ. मेधा कुलकर्णी, पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, मीरा सुरेश कलमाडी आदी उपस्थित होते.

यावेळी उपराष्ट्रपती राधाकृष्णन यांच्या हस्ते ज्येष्ठ कलाकार मोहन जोशी यांना 'पुणे फेस्टिव्हल जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. पुण्याच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक योगदानाचा गौरव करतांना उपराष्ट्रपती राधाकृष्णन यांनी पुणे ही राज्याची सांस्कृतिक राजधानी असल्याचे सांगितले. ते म्हणाले, पुणे फेस्टिव्हलने कला, संस्कृती, संगीत, नृत्य, साहित्य, क्रीडा आणि पर्यटन क्षेत्राला एकत्र आणत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख निर्माण केली आहे. विविध देशांतील कलाकार, पर्यटक, प्रतिनिधी आणि विद्यार्थ्यांच्या सहभागातून सांस्कृतिक देवाणघेवाणीला चालना मिळते. यंदाच्या महोत्सवात 21 देशांतील विद्यार्थी सहभागी झाले हे विविध श्रद्धा, संस्कृती आणि परंपरांचा आदर ही भारताच्या सांस्कृतिक जीवनाची वैशिष्ट्ये असल्याचे उपराष्ट्रपतींनी नमूद केले. महिलांना कला, सर्जनशीलता आणि प्रतिभा सादर करण्यासाठी पुणे फेस्टिव्हलने व्यासपीठ उपलब्ध करून दिले असून अशा उपक्रमांमुळे महिलांचा आत्मविश्वास आणि सक्षमीकरणाला चालना मिळते. पुणे फेस्टिव्हलशी संबंधित महिला पदाधिकाऱ्यांचा उल्लेख करत त्यांनी वैयक्तिक दुःखावर मात करून सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या महिलांचे कौतुक केले.

# सायबर फसवणूक; सावधगिरी हाच सुरक्षिततेचा मार्ग

**विशेष लेख : 'लोकसंवाद - २०२६'**

(दै. संध्या)



*गणेशोत्सव हा केवळ श्रद्धेचा आणि सांस्कृतिक उत्सव नसून समाजप्रबोधनाचेही प्रभावी माध्यम आहे. याच उद्देशाने माहिती व जनसंपर्क विभागाच्या वतीने गणेशोत्सवात 'लोकसंवाद-२०२६' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत विविध गणेश मंडळांसमोर सायबर पोलीस ठाणे, पुणे शहर यांच्या माध्यमातून नागरिकांना सायबर गुन्हे आणि त्यापासून बचावाच्या उपाययोजनांची माहिती दिली जात आहे. त्याच अनुषंगाने पुणे जिल्हा माहिती कार्यालयाने नागरिकांच्या उपयोगासाठी सायबर सुरक्षेशी संबंधित ही माहिती एकत्रित स्वरूपात संकलित केली आहे.*

आज मोबाईल आणि इंटरनेट आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग झाले आहेत. ऑनलाइन बँकिंग, खरेदी, गुंतवणूक, समाजमाध्यमे आणि डिजिटल व्यवहारांमुळे अनेक कामे सहज झाली असली तरी त्याचबरोबर सायबर फसवणुकीचे प्रकारही वाढले आहेत. सायबर गुन्हेगार नवनवीन पद्धती वापरून नागरिकांना भीती दाखवतात, आकर्षक आमिषे देतात किंवा भावनिक दबाव निर्माण करतात. त्यामुळे अनोळखी फोन, संदेश, लिंक किंवा ऑनलाइन ओळखीवर सहज विश्वास न ठेवता प्रत्येक वेळी खातरजमा करणे आवश्यक आहे. यातील एक गंभीर प्रकार म्हणजे 'डिजिटल अरेस्ट'. यामध्ये सायबर गुन्हेगार स्वतःला पोलीस अधिकारी किंवा तपास यंत्रणेचे अधिकारी असल्याचे भासवतात. तुमच्या नावावर गुन्हा दाखल आहे, तुमच्या खात्यात बेकायदेशीर व्यवहार झाले आहेत, अशी भीती दाखवून व्हिडीओ कॉलवर चौकशीच्या नावाखाली नागरिकांना जोडून ठेवले जाते आणि पैसे देण्याची मागणी केली जाते. लक्षात ठेवा, कोणतीही राज्य किंवा केंद्र शासनाची तपास यंत्रणा फोन किंवा व्हिडीओ कॉलवर कारवाई न करण्याच्या बदल्यात पैसे मागत नाही. त्यामुळे अशा फोनला घाबरून पैसे देऊ नका आणि अनोळखी व्हिडीओ कॉल स्वीकारणे टाळा. तुमचा मोबाईल क्रमांक बंद होणार आहे, केवायसी पूर्ण केलेली नाही किंवा तुमच्या क्रमांकावर गैरप्रकार झाल्याचे सांगून दूरसंचार विभागाच्या किंवा 'ट्राय'च्या नावानेही फसवणूक केली जाते. अशा वेळी कोणतीही माहिती किंवा कागदपत्रे देण्यापूर्वी संबंधित दूरसंचार सेवा प्रदात्याच्या अधिकृत माध्यमातून माहितीची खातरजमा करावी. तुमच्या नावाचे पार्सल सीमाशुल्क विभागाने अडवले आहे, त्यामध्ये बेकायदेशीर वस्तू सापडल्या आहेत, त्यामुळे दंड भरावा लागेल, असे सांगूनही नागरिकांना लक्ष्य केले जाते. आपण कोणतेही पार्सल मागवले नसल्यास अशा फोनवर विश्वास ठेवू नये. अनोळखी लिंकवर क्लिक करू नये आणि बँक खात्याची माहिती देऊ नये. अनोळखी व्यक्तींकडून होणारे व्हॉट्सअॅप व्हिडीओ कॉल हेही धोकादायक ठरू शकतात. काही प्रकरणांमध्ये महिलेचा पूर्व-रेकॉर्ड केलेला व्हिडीओ दाखवून समोरच्या व्यक्तीचा फोटो किंवा व्हिडीओ रेकॉर्ड केला जातो. त्यात फेरफार करून समाजमाध्यमांवर प्रसारित करण्याची धमकी देत पैशांची मागणी केली जाते. या प्रकाराला 'सेक्सटॉर्शन' म्हणतात. अशा प्रकाराला बळी पडल्यास घाबरून पैसे देऊ नयेत. उपलब्ध पुरावे जतन करून तातडीने सायबर पोलिसांकडे तक्रार करावी. 'घरबसल्या काम करा आणि मोठी कमाई करा', 'टास्क पूर्ण करा आणि पैसे मिळवा', अशा जाहिराती किंवा टेलिग्राम-व्हॉट्सअॅप समूहांपासूनही सावध राहणे गरजेचे आहे. सुरुवातीला थोडे पैसे देऊन विश्वास संपादन केला जातो आणि नंतर अधिक पैसे गुंतवण्यास सांगून मोठी रक्कम लुबाडली जाते. त्याचप्रमाणे शेअर बाजार, आयपीओ, बिटकॉईन किंवा अन्य गुंतवणुकीत मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून फसवणूक केली जाते. त्यामुळे गुंतवणूक करण्यापूर्वी संबंधित संस्था आणि मध्यस्थ अधिकृत आहेत का, याची खातरजमा करावी. व्यवहार केवळ अधिकृत अॅप किंवा संकेतस्थळावरूनच करावा.

'तुमचे वीज बिल थकीत आहे, आजच पैसे भरले नाहीत तर वीजपुरवठा बंद होईल' किंवा 'गॅस बिल न भरल्याने जोडणी बंद होणार आहे', अशा संदेशांद्वारेही घाई निर्माण केली जाते. अशा संदेशातील लिंकवर क्लिक करण्याऐवजी संबंधित वीज किंवा गॅस कंपनीच्या अधिकृत माध्यमातून बिलाची माहिती तपासावी.

कमी कागदपत्रांत तातडीने कर्ज देण्याचे आमिष दाखवणाऱ्या बनावट कर्ज अॅपपासूनही सावध राहणे आवश्यक आहे. अशा अॅपच्या माध्यमातून मोबाईलमधील फोटो, संपर्क यादी आणि अन्य संवेदनशील माहिती मिळवली जाऊ शकते. त्यामुळे अनोळखी अॅप किंवा एपीके फाइल मोबाईलमध्ये इन्स्टॉल करू नये आणि अॅपला अनावश्यक परवानग्या देऊ नयेत.

आपले बँक खाते अनोळखी व्यक्तीला वापरण्यास देऊ नका : सायबर गुन्हेगारांकडून नागरिकांना पैशांचे आमिष दाखवून किंवा अन्य कारणे सांगून त्यांचे बँक खाते, एटीएम कार्ड, इंटरनेट बँकिंग किंवा इतर बँकिंग सुविधा वापरण्यास मागितल्या जाऊ शकतात. अशा प्रकारे आपले बँक खाते अनोळखी व्यक्तीला वापरण्यास दिल्यास, सायबर फसवणुकीतून मिळालेले पैसे आपल्या खात्यात जमा होऊ शकतात. त्यानंतर ते पैसे इतर खात्यांमध्ये हस्तांतरित करण्यासाठी आपल्या खात्याचा वापर केला जाऊ शकतो.

आपले बँक खाते सायबर गुन्ह्यातील पैशांच्या व्यवहारासाठी वापरले गेल्यास तपासामध्ये आपल्या भूमिकेची चौकशी होऊ शकते. गुन्ह्याचे स्वरूप आणि उपलब्ध पुराव्यांनुसार कायदेशीर कारवाईची शक्यता असते. त्यामुळे कोणत्याही आमिषाला बळी पडून आपले बँक खाते अनोळखी व्यक्तीला वापरण्यास देऊ नये. बँक खाते क्रमांक, इंटरनेट बँकिंगचा पासवर्ड, एटीएम पिन आणि ओटीपी गोपनीय ठेवावा. आपल्या खात्यात अनोळखी किंवा संशयास्पद रक्कम जमा झाल्यास ती परस्पर दुसऱ्या खात्यात हस्तांतरित करू नये. अशा प्रकारचा व्यवहार आढळल्यास तातडीने बँकेशी आणि पोलिसांशी संपर्क साधावा.

समाजमाध्यमे किंवा डेटिंग अॅपवर झालेल्या ऑनलाइन ओळखीतून पैसे, वैयक्तिक माहिती किंवा महागड्या भेटवस्तूंची मागणी केली जात असल्यास सावध राहावे. 'पैशांची मागणी करणाऱ्या ऑनलाइन प्रेमावर विश्वास ठेवू नका' हा नियम लक्षात ठेवावा. तसेच, 'तुमच्या खात्यात चुकून पैसे जमा झाले आहेत, ते परत पाठवा', असे सांगणाऱ्यांपासूनही सावध राहावे. अशा वेळी स्वतःहून पैसे परत न पाठवता बँकेशी संपर्क साधून व्यवहाराची खातरजमा करावी.

सायबर फसवणूक टाळण्यासाठी काही साध्या सवयी अंगीकारणे आवश्यक आहे. अनोळखी व्यक्तीला ओटीपी, पासवर्ड, बँक खात्याचे तपशील, डेबिट किंवा क्रेडिट कार्डची माहिती, आधार-पॅनची प्रत, फोटो किंवा पत्ता देऊ नये. संशयास्पद लिंकवर क्लिक करू नये. आर्थिक आणि समाजमाध्यम खात्यांसाठी वेगवेगळे, मजबूत आणि किमान १२ अक्षरांचे पासवर्ड वापरावेत. द्विस्तरीय प्रमाणीकरणाची सुविधा सुरू ठेवावी. अनोळखी टेलिग्राम किंवा व्हॉट्सअॅप समूहात जोडले गेल्यास तातडीने त्या समूहातून बाहेर पडावे. व्हॉट्सअॅपच्या गोपनीयता सेटिंगमध्ये आपल्या संपर्कातील व्यक्तींनाच समूहात जोडता येईल, अशी व्यवस्था करावी. समाजमाध्यमे म्हणजे आपली वैयक्तिक डायरी नाही. आपल्या वैयक्तिक आयुष्यातील प्रत्येक माहिती, प्रवास, ठिकाण, कुटुंबीयांची माहिती किंवा अन्य संवेदनशील तपशील सार्वजनिक करणे टाळावे. अनोळखी व्यक्तींच्या मैत्री विनंत्या स्वीकारण्यापूर्वी त्यांची ओळख तपासावी. एखाद्या मित्राच्या किंवा नातेवाईकाच्या नावाने पैसे मागितले तरी प्रत्यक्ष फोन करून खातरजमा केल्याशिवाय पैसे पाठवू नयेत. आर्थिक खात्यांमध्ये असुरक्षित किंवा सार्वजनिक संगणकावरून प्रवेश करणे टाळावे. ई-मेलमधील पाठवणाऱ्याचा डोमेन आणि संकेतस्थळाच्या पत्त्यातील स्पेलिंग तपासावे.

सायबर फसवणूक झाली तर घाबरू नका आणि वेळ वाया घालवू नका. तातडीने १९३० या राष्ट्रीय सायबर गुन्हे हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच राष्ट्रीय सायबर गुन्हे अहवाल पोर्टल cybercrime.gov.in वर तक्रार नोंदवावी. पुणे शहरातील नागरिक सायबर पोलीस ठाणे, शिवाजीनगर, पुणे शहर येथेही संपर्क साधू शकतात. उपलब्ध संपर्क क्रमांक ७०५८७१९३७५ / ७०५८७१९३७१ असून ई-मेल crimecyber.pune@nic.in आहे.

मोबाईल हरवला किंवा चोरीला गेल्यास जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवून संचार साथीच्या सीईआयआर (CEIR) सुविधेचा वापर करता येतो. यासाठी मोबाईलचा आयएमईआय (IMEI) क्रमांक आवश्यक असतो. हा क्रमांक मोबाईलच्या बॉक्सवर किंवा उपलब्ध असल्यास बॅटरीच्या मागील बाजूस असलेल्या स्टिकरवर आढळतो. मोबाईल हाताशी असल्यास *#06# हा क्रमांक डायल करूनही आयएमईआय क्रमांक पाहता येतो. संचार साथी संकेतस्थळावरून हरवलेल्या किंवा चोरीला गेलेल्या मोबाईलला ब्लॉक करण्याची प्रक्रिया करता येते. आपल्या नावावर किती मोबाईल क्रमांक सुरू आहेत, हे तपासण्यासाठीही संचार साथीवरील टीएएफसीओपी (TAFCOP) सुविधेचा वापर करता येतो. सायबर सुरक्षेचा सर्वात महत्त्वाचा नियम म्हणजे घाई करू नका, घाबरू नका आणि खातरजमा केल्याशिवाय कोणतीही माहिती किंवा पैसे देऊ नका. सायबर गुन्हेगार कितीही विश्वासार्ह भाषेत बोलत असले तरी त्यांच्या सांगण्यावरून तातडीने आर्थिक व्यवहार करू नका. एपीके डाउनलोड केल्याने मोबाईलमधील संवेदनशील माहिती धोक्यात येऊ शकते, तर बँक खाते अनोळखी व्यक्तीला वापरण्यास दिल्यास सायबर गुन्ह्यातील आर्थिक व्यवहाराच्या तपासात आपली चौकशी होण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. एका फोनकॉलमुळे, एका लिंकवर क्लिक केल्यामुळे किंवा एका चुकीच्या निर्णयामुळे मोठे नुकसान होऊ शकते. त्यामुळे डिजिटल जगात वावरताना सावधगिरी, जागरूकता आणि जबाबदारी हीच आपली खरी सुरक्षा आहे. सायबर फसवणूक झाल्यास तातडीने १९३० वर संपर्क करा. सावध राहा, सुरक्षित राहा!

संकलन :- जिल्हा माहिती कार्यालय, पुणे

### अनोळखी एपीके फाइल डाउनलोड करू नका

सायबर गुन्हेगार नागरिकांना विविध कारणे सांगून एपीके फाइलची लिंक पाठवतात. 'SBI.apk', 'RTO Challan.apk', 'e-Challan.apk', 'MNGL.apk' अशा नावांच्या फाइल पाठवून त्या डाउनलोड करण्यास प्रवृत्त केले जाते. अशा अनोळखी किंवा बनावट एपीके फाइल मोबाईलमध्ये इन्स्टॉल केल्यास, त्यांना दिलेल्या परवानग्यांनुसार मोबाईलमधील संवेदनशील माहितीचा गैरवापर होऊ शकतो. मोबाईलवरील माहिती, एसएमएस किंवा इतर सुविधांचा गैरवापर करून आर्थिक फसवणुकीचा प्रयत्न केला जाऊ शकतो. त्यामुळे अनोळखी व्यक्तीकडून आलेल्या एपीके लिंकवर क्लिक करू नये. एसबीआय, आरटीओ, ई-चलान किंवा एमएनजीएलच्या नावाने आलेल्या संशयास्पद फाइल डाउनलोड करू नयेत. मोबाईलमध्ये अनोळखी अॅप इन्स्टॉल करण्यापूर्वी त्याची सत्यता तपासावी. बँकिंगसंबंधी माहिती किंवा ओटीपी कोणालाही देऊ नये. संशयास्पद लिंक प्राप्त झाल्यास संबंधित विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावरूनच माहितीची खातरजमा करावी.

# संपादकीय

## ब्रिक्स परिषदेत भारताचा प्रेरणादायी ठसा

नवी दिल्ली येथे १८ वी ब्रिक्स शिखर परिषद पार पडली. या परिषदेत जागतिक राजकारण, दहशतवाद. पश्चिम आशियातील संकट. व्यापार. डॉलरला पर्याय आणि ग्लोबलची भूमिका यासारख्या महत्त्वाच्या मुद्यावर सखोल चर्चा झाली. भारत देशाच्या अध्यक्षतेखाली या सगळ्या बैठका यशस्वीरित्या पार पडल्या. हे भारताचे मोठे राजनैतिक यश मानले जात आहे. इराण-युएई आणि सौदी अरेबिया यांच्यातील तणावाच्या वातावरणात या तिन्ही देशाच्या प्रतिनिधीना एकाच व्यासपीठावर एकत्र आणण्याचे मोठे आव्हान भारताने लीलया पेलल्याचे दिसून आले. पश्चिम आशियातील वाढत्या हिंसाचाराबद्दल ब्रिक्स देशानी तीव्र चिंता व्यक्त केली. तसेच जागतिक कारभार सुधारण्यासाठी दहा कलमी कार्यक्रम मांडण्यात आला. भारताच्या डिजिटल सार्वजनिक सुविधेचा अनुभव ब्रिक्स सहकार्यासाठी अत्यंत उपयुक्तकारक ठरू शकतो. ही बाब या परिषदेत प्रकर्षाने अधोरेखित झाली. या क्षेत्रात भारताने आपले प्रभावी नेतृत्व सिध्द केलेले आहे. ब्रिक्स परिषद हे भारताला जागतिक स्तरावर आपले स्थान मजबूत करण्यासाठी मिळालेले एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरले आहे.ब्रिक्स संमेलनाच्या शेवटच्या दिवशी पंतप्रधान यांच्या वतीने आयोजित स्नेहभोजनात संपूर्णपणे शाकाहारी भोजन ठेवण्याचा अट्टाहास हा राजनैतिक अपरिपक्वतेचा आविष्कार किंवा शाकाहार कसा श्रेष्ठ हे जगाला दाखवण्यासाठी केलेला केविलवाणा प्रयत्न असे म्हणावे लागल्याची कुजबुज यावेळी झाल्याचे सांगण्यात आले. श्रेष्ठत्व आजमावून पाहायचे होते तर शाकाहारी व मांसाहारी दोन्ही प्रकारची जेवण ठेवून परदेशी पाहुण्यांचा कल अजमावता आला असता. आजच्या घटकेला जगात सगळीकडे जवळजवळ मांसाहार व मासे हा दैनदिन जीवनात व जेवणात मुख्य घटक मानला जातो. आपल्या भारतातही २५ ते ३० टक्केच लोक शाकाहारी आहेत. त्यामुळे आपली खाद्यपरंपरा परदेशी पाहुण्यांवर लादणे प्रशस्त वाटत नसल्याची चर्चा दिल्लीत सुरू होती. शाकाहारी भोजनाचा बेत असल्यामुळे चीनच्या अध्यक्षानी भोजनाचा आस्वाद घेण्याचे टाळले अशी शक्यता नाकारता येत नाही. तसेच युएईच्या अध्यक्षानी भोजनाला येण्याचे टाळले. त्यामुळे शाकाहारी जेवणाचा आग्रह करून "अतिथी देवो भव या उदात्त परंपरेला धक्का लावणे योग्य वाटत नाही. असो भोजनाच्या बाबतीत राजनैतिक अपरिपक्वतेचा आविष्कार सगळ्यांना समजला.तरी या ब्रिक्स परिषदेत आपल्या भारत देशाचे जागतिक स्तरावर प्रबळ व मजबूत स्थान सिध्द झाले आहे. त्यामुळे ब्रिक्सचे यश सर्वाथाने प्रेरणादायी ठरलेले आहे.

# १७ सप्टेंबर "राष्ट्रीय श्रमिक दिन" म्हणून घोषित करावा

■ पुणे (दै. संध्या)

भगवान विश्वकर्मा जयंतीचा दिवस असलेला १७ सप्टेंबर हा दिवस "राष्ट्रीय श्रमिक दिन" म्हणून अधिकृतपणे घोषित करण्यात यावा, या प्रमुख मागणीसाठी भारतीय मजदूर संघ, पुणे जिल्ह्याच्या वतीने पुणे जिल्हाधिकारी कार्यालय तसेच जिल्ह्यातील विविध तहसीलदार कार्यालयांमार्फत मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांना निवेदन सादर करण्यात आले.

तसेच, पुणे येथील विश्वकर्मा भवन, भारतीय मजदूर संघ कार्यालयात भगवान विश्वकर्मा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी वंचित, शोषित व कंत्राटी कामगारांसह सर्व श्रमिकांना न्याय, सामाजिक सुरक्षा आणि सन्मान मिळवून देण्यासाठी संघटितपणे कार्य करण्याचा निर्धार करण्यात आला. तसेच जिल्ह्यातील विविध उद्योगातील सरकारी, निमशासकीय, सार्वजनिक उपक्रम, खाजगी ओद्यौगीक आस्थापनेत उत्साहात संपन्न करण्यात आला .



भारतीय मजदूर संघाच्या वतीने दरवर्षी १७ सप्टेंबर रोजी भगवान विश्वकर्मा जयंती श्रमिक दिन म्हणून साजरी करण्यात येते. भगवान विश्वकर्मा हे निर्मिती, कौशल्य, तंत्रज्ञान, उद्योग आणि श्रमाचे प्रतीक मानले जातात. देशाच्या आर्थिक, औद्योगिक आणि पायाभूत विकासामध्ये कामगार, कारागीर, तंत्रज्ञ, अभियंते तसेच विविध क्षेत्रांतील श्रमिकांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

देशाच्या विकास प्रक्रियेत श्रमिकांच्या श्रम व कौशल्याचा राष्ट्रीय स्तरावर गौरव व्हावा, श्रमप्रतिष्ठेची भावना अधिक दृढ व्हावी आणि भावी पिढ्यांमध्ये कौशल्य व श्रमाबद्दल सन्मानाची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने १७ सप्टेंबर हा दिवस "राष्ट्रीय श्रमिक दिन" म्हणून घोषित करावा, अशी मागणी भारतीय मजदूर संघाने केंद्र सरकारकडे केली आहे. या मागणीचे निवेदन पुणे जिल्हाधिकारी कार्यालय तसेच जिल्ह्यातील विविध तहसीलदार कार्यालयांमार्फत केंद्र सरकारकडे पाठविण्यात आले आहे. "राष्ट्रहित, उद्योगहित व कामगारहित" या त्रिसूत्रीच्या माध्यमातून भारतीय मजदूर संघ कामगारांच्या हक्क, सामाजिक सुरक्षा व कल्याणासाठी सातत्याने कार्यरत आहे.

यावेळी भारतीय मजदूर संघ पुणे जिल्ह्याचे अध्यक्ष अर्जुन चव्हाण, सचिव सागर पवार, भारतीय मजदूर संघ संघटन सचिव बाळासाहेब भुजबळ, अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघाचे सरचिटणीस सचिन मेंगाळे, मीडिया प्रभारी निलेश खेडकर, रविंद्र देशपांडे, जिल्हा उपाध्यक्ष मनोज भदारके, उमेश विश्वाद, श्रीमती बेबीराणी डे , राम सरवसे, यश निंबाळकर , यांच्यासह विविध संलग्न कामगार संघटनांचे पदाधिकारी, कामगार प्रतिनिधी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## बोरा महाविद्यालयात जागतिक ओझोन दिन उत्साहात साजरा

■ शिरूर (दै. संध्या)

शिरूर शिक्षण प्रसारक मंडळाचे चांदमल ताराचंद बोरा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरूर येथे भूगोल विभागाच्या वतीने 16 सप्टेंबर रोजी जागतिक ओझोन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



जागतिक ओझोन दिनानिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथील भूगोल विभागाच्या सहयोगी प्राध्यापिका डॉ. हेमलता पटेल यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. "From Ozone Hole to Climate Hope: The Evolution of the World's Most Successful Environmental Treaty" या विषयावर डॉ. हेमलता पटेल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या व्याख्यानातून त्यांनी ओझोन थराचे महत्त्व, ओझोन क्षयाची कारणे, मॉन्ट्रियल प्रोटोकॉलची भूमिका तसेच हवामान बदल आणि पर्यावरण संरक्षण याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. सी. मोहिते आणि उपप्राचार्य प्रा. एच. एस. जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. या विशेष व्याख्यानास 120 पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूगोल विभागप्रमुख डॉ. अतुल जेठे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. आर. एम. कोंडेकर यांनी करून दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगतात उपप्राचार्य प्रा. एच. एस. जाधव यांनी पर्यावरण संवर्धन आणि ओझोन थराच्या संरक्षणासाठी विद्यार्थ्यांनी जागरूक राहण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. वैष्णवी देसले यांनी केले.

## प्र.मा. पाटील यांच्या कार्यकर्तृत्वाला उजाळा

■ ओतूर(दै. संध्या)

गाडगे महाराज शिक्षण संकुलात दलित मित्र प्र.मा. पाटील यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त त्यांच्या स्मृतींना उजाळा देणारा कार्यक्रम भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाची माहिती गाडगे महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक संपत माने यांनी दिली.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामदास बगाड यांनी केले. यावेळी त्यांनी प्र. मा. पाटील यांच्या जीवनप्रवासासह सामाजिक कार्याचा आढावा घेत त्यांच्या कार्यातील विविध पैलू उपस्थितांसमोर मांडले. मुख्याध्यापक संजय स्वर्गीय यांनी, "व्यक्तीचे आयुष्य संपते; मात्र त्यांचे कार्य त्यांना अमरत्व देते," असे सांगत प्र. मा. पाटील यांच्या कार्याच्या आठवणींना उजाळा दिला. मनीषा पाटील यांनी प्र. मा. पाटील यांच्या आठवणींना उजाळा देताना त्यांच्या कार्याविषयी भावना व्यक्त केल्या. तसेच शोभा तांबे यांनी संत तुकारामांच्या अभंगातील ओळींचा संदर्भ देत गाडगे महाराज शिक्षण संकुल हे प्र.मा. पाटील यांच्या कार्याचे ज्वलंत उदाहरण असल्याचे सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करून प्र. मा. पाटील यांच्या स्मृती जागृत केल्या. कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य नितीन पाटील, उल्हास पाटील, वनिता पाटील उपस्थित होते.



## सिंहगड रोड हिंगणे ते सहकारनगर सातारा रोड वाहतुकीसाठी बोगद्याच्या पर्यायी मार्गाची महापौर मंजुषा नागपुरे यांच्याकडून पूर्वपाहणी

■ पुणे (दै. संध्या)

■ नागरिकांना सुरक्षित व सुलभ दळणवळणाची सुविधा देण्यासाठी महापौरांचा पुढाकार

हिंगणे खुर्द सिंहगड रोड ते सहकारनगर सातारा रोड परिसरातील वाढती वाहतूक आणि नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन वाहतुकीसाठी आणखी एक पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महापौर मंजुषा नागपुरे यांनी हिंगणे-खोराड वस्ती परिसरात डोंगरातून बोगदा (Tunnel) निर्माण करण्याच्या प्रस्तावाची आज पूर्वपाहणी केली. या प्रस्तावित बोगद्यामुळे हिंगणे ते सहकारनगर तसेच तळजाई परिसरातील दळणवळण अधिक सुलभ होण्यासोबतच नागरिकांचा वेळ व प्रवासाचे अंतर कमी करण्यास मदत होणार आहे. प्रस्तावित मार्गाची प्रत्यक्ष पाहणी करून प्रकल्पाच्या व्यवहार्यता, तांत्रिक बाबी आणि आवश्यक उपाययोजनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली.

पुणे शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासोबतच नागरिकांना पर्यायी मार्ग उपलब्ध करून देणे, हा महापौर मंजुषा नागपुरे यांच्या पुढाकाराचा महत्त्वाचा भाग आहे. याच अनुषंगाने हिंगणे-खोराड वस्ती येथील रस्ता रुंदीकरण तसेच नाल्यावर कल्व्हर्ट बांधून तो बंदिस्त करण्याच्या प्रस्तावित कामांचीही पाहणी करण्यात आली. परिसरातील वाहतूक कोंडी, नागरिकांची सुरक्षितता आणि भविष्यातील वाढती वाहतूक लक्षात घेऊन आवश्यक पायाभूत सुविधा विकसित करण्याबाबत महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी मा. नगरसेवक श्री. प्रसन्न जगताप, मा. नगरसेविका सौ. ज्योती गोसावी, पुणे महानगरपालिका प्रकल्प अधिकारी श्री. गोजारे तसेच महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## नारायणगाव महाविद्यालयात 'भारतीय राष्ट्र' विषयावर विशेष व्याख्यान

■ नारायणगाव(दै. संध्या)

ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव आणि ३६ महाराष्ट्र बटालियन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रनिर्मिती : माझा अभिमान माझी जबाबदारी "Indian Nation – Our Pride, Our Responsibility" या विषयावर प्रेरणादायी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ, मानसशास्त्रज्ञ, शैक्षणिक नेतृत्वकर्ता व प्रेरणादायी वक्ते प्रा. डॉ. अश्विन कुमार भारद्वाज उपस्थित होते. तसेच ब्रुकर इंडिया सायंटिफिक प्रायव्हेट लिमिटेडचे रीजनल मॅनेजर कर्नाटक बेंगलोरचे सेल्स श्री. प्रकाश सिद्दाप्पा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी होते. तसेच महाविद्यालयाचे मानसशास्त्र विभाग प्रमुख व एनसीसीचे ए. एन.ओ. कॅप्टन डॉ. दिलीप शिवणे यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमामुळे महाविद्यालयातील एनसीसी कॅडेट्समध्ये राष्ट्रप्रेम, जबाबदारी, नेतृत्व, आत्मपरीक्षण आणि वैज्ञानिक दृष्टिकोन याबाबत प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.

## दृष्टिबाधित विद्यार्थिनींनीही जाणून घेतले विद्युत सुरक्षेचे महत्त्व

■ शिरूर (दै. संध्या)

डोळ्यांना दृष्टी नसली तरी कान, नाक आणि स्पर्शाच्या माध्यमातून जग समजून घेण्याची विलक्षण क्षमता असलेल्या दृष्टिबाधित विद्यार्थिनींनी आवाज, वास आणि स्पर्शाच्या माध्यमातून वीज सुरक्षा, हरित ऊर्जा आणि ऊर्जा बचतीचे धडे घेतले. पुण्यातील 'द पूना स्कूल अँड होम फॉर द ब्लाइंड' येथे अभियंता दिनानिमित्त महावितरणच्या वतीने आयोजित विशेष प्रबोधन सत्रात विद्यार्थिनींना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे विद्युत सुरक्षेची माहिती देण्यात आली.



अतिरिक्त कार्यकारी अभियंता हितेंद्र भिरुड यांनी सूर्यप्रकाश व वाऱ्यापासून मिळणाऱ्या स्वच्छ ऊर्जेचे महत्त्व आणि त्यातून पर्यावरणाचे संरक्षण कसे करता येते, हे सोप्या उदाहरणांतून स्पष्ट केले. सहाय्यक अभियंता अतुल धांडोरे यांनी विजेचा दैनंदिन वापर आणि घ्यावयाची काळजी याबाबत विद्यार्थिनींशी संवाद साधला. अतिरिक्त कार्यकारी अभियंता चरणसिंग इंगळे यांनी घरातील विद्युत उपकरणे, स्वीचबोर्ड, तुटलेल्या किंवा उघड्या तारा तसेच पावसाळ्यातील विद्युत धोके याबाबत मार्गदर्शन केले. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत, विशेषतः दिव्यांग व विशेष विद्यार्थ्यांपर्यंत वीज सुरक्षा आणि ऊर्जा साक्षरतेचा संदेश पोहोचविणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.

सहाय्यक अभियंता अतुल धांडोरे, सहाय्यक अभियंता पल्लवी सासणे, कार्यालयीन सहाय्यक विष्णू भुजबळ आणि वरिष्ठ तंत्रज्ञ जमील शेख यांनी विशेष प्रात्यक्षिके घेतली. डासांच्या रॅकेटच्या माध्यमातून शॉर्ट सर्किटच्या ठिणग्यांसारखा 'चर्र-चर्र' आवाज ऐकविण्यात आला. जळालेल्या वायरच्या इन्सुलेशनचा वास जाणवून देत विद्युत बिघाडाची पूर्वसूचना कशी ओळखायची,

## पुण्यातील गणेशोत्सवाचे भव्य देखावे ठरले आकर्षण

■ पुणे (दै. संध्या)

गणेशोत्सवाच्या निमित्ताने मध्य पुण्यातील पेठांमध्ये भव्य-दिव्य देखावे पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी उसळत आहे. ऐतिहासिक प्रसंगांपासून ते पौराणिक कथांपर्यंत आणि सामाजिक संदेश देणाऱ्या देखाव्यांनी यंदाचा उत्सव अधिकच खुलून गेला आहे.

नारायण पेठेतील श्री गरूड गणपती मंडळ ट्रस्टने यंदा ८३ व्या वर्षात पदार्पण केले असून, 'कथा आदिशक्तीची दशामहाविद्याची' हा आकर्षक देखावा साकारला आहे. मंडळाचे अध्यक्ष सुनील कुंजीर व उपाध्यक्ष केदार काटे आहेत. ८८ व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या भरत मित्रमंडळाने अलिबाबा चाळीस चोर (खुल जा सिम सिम) हा जिवंत देखावा सादर करून बालचमूंसह भाविकांची मने जिंकली आहेत. मंडळाचे अध्यक्ष निरंजन बाळासाहेब दाभेकर यांनी या देखाव्याच्या आयोजनाचे नियोजन केले. सदाशिव पेठेतील खालकर चौक मित्रमंडळाचे ५४ वे वर्ष असून, त्यांनी 'अफजलखान वध' हा जिवंत ऐतिहासिक प्रसंग साकारला आहे. अध्यक्ष चिन्मय अभ्यंकर, उपाध्यक्ष गौरव भागवत, कार्याध्यक्ष चैतन्य कानडे आणि आधारस्तंभ अजय शिंदे यांच्या मार्गदर्शनात हा देखावा आहे.

# सूर्यदत्त फाउंडेशनतर्फे विविध राष्ट्रीय पुरस्कारांसाठी नामांकने आमंत्रित

■ पुणे : (दै. संध्या)

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या माध्यमातून कार्यरत असलेल्या बन्सी-रत्न वेल्फेअर ट्रस्टतर्फे समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्ती आणि कुटुंबांचा गौरव करणाऱ्या वार्षिक पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे.

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या बन्सी-रत्न वेल्फेअर ट्रस्टतर्फे दरवर्षी जैन समाजातील समाजसेवा, सामाजिक विकास आणि सामुदायिक विकासासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवर व्यक्ती आणि कुटुंबांचा आदर्श माता-पिता, आदर्श परिवार, समाज शिरोमणी, समाज भूषण, समाज रत्न, मानव सेवा राष्ट्रीय पुरस्कार आणि 'आयकॉन ऑफ राजस्थान'



पुरस्कार अशा विविध पुरस्कारांनी गौरव करण्यात येतो. यंदाच्या पुरस्कार सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे सूर्यदत्तचा अत्यंत प्रतिष्ठेचा आणि मानाचा पुरस्कार गुरुदेव प. पू. रामनिक मुनीजी मा सा (वाणी के जादूगर) यांना प्रदान करण्यात येणार आहे. त्यांच्या असामान्य आध्यात्मिक प्रवासाचा, समाजासाठी दिलेल्या उल्लेखनीय योगदानाचा आणि मानवसेवेसाठी केलेल्या प्रेरणादायी कार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

पुरस्कारार्थींना सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि पारंपरिक शाल (उपरना) देऊन गौरविण्यात येणार आहे. या प्रतिष्ठित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहिंसा विश्व भारतीचे संस्थापक आचार्य डॉ. लोकेश मुनीजी उपस्थित राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध शास्त्रज्ञ व IISER चे सल्लागार श्री. अरविंद नाटू, तर विशेष अतिथी म्हणून प्रसिद्ध अभिनेते रझा मुराद तसेच इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या पुरस्कारांसोबतच जैन, गुजराती, माहेश्वरी आणि अग्रवाल समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचाही विशेष सत्कार करण्यात येणार आहे. इयत्ता १० वी, इयत्ता १२ वी, पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना यावेळी गौरविण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी www.suryadatta.org या संकेतस्थळाला भेट द्यावी. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, संस्थापक व अध्यक्ष, सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन यांनी सांगितले की, हा कार्यक्रम गुणवंत विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाची दखल घेण्यासोबतच त्यांना त्यांच्या करिअर आणि जीवनातील योग्य संधी व मार्गदर्शन मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरतो. "पात्र विद्यार्थ्यांनी सूर्यदत्तच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेला 'Meritorious Student Felicitation Form' भरावा आणि सत्कार समारंभाला विद्यार्थ्यांची वैयक्तिक उपस्थिती अनिवार्य आहे," असे प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी सांगितले. दिनांक : रविवार, २७ सप्टेंबर २०२६ स्थळ : साधना सदन, शिवशंकर सभागृह, महर्षी नगर, पुणे – ४११०३७ वेळ : रिपोर्टिंग – दुपारी ३.०० वाजता (कृपया वेळेवर उपस्थित राहावे.) नामांकनासाठी लिंक : https://forms.gle/TasJL7HDQa97HkK99 या सोहळ्यात गुणवंत विद्यार्थ्यांना गुणवत्ता प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह आणि सुवर्णपदक देऊन गुरुदेव प. पू. रामनिक मुनीजी मा सा (वाणी के जादूगर), अध्यक्ष, प्रमुख पाहुणे आणि विशेष अतिथी यांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. खालीलपैकी कोणतीही एक पात्रता पूर्ण करणारे विद्यार्थी सत्कारासाठी पात्र असतील.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



### 'दगडूशेठ' गणपतीला केरळी वाद्य चेंदा मेलम वादनाने अभिवादन

पुणे : दैनिक संध्या

केरळ आणि तुळुनाडूमध्ये सांस्कृतिक घटक म्हणून परिचित असलेले केरळी वाद्य चेंदा मेलम वादनाने 'दगडूशेठ' गणपतीला अभिवादन करण्यात आले. चेंदा हे कर्नाटकातील तुलुनाडू आणि तामिळनाडूमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने उत्सवाच्या १३४ व्या वर्षी उत्सव मंडपात गणरायासमोर हे वादन झाले. दरवर्षी या वाद्य वादनाने गणरायाला अभिवादन केले जाते. यंदाचे वादनसेवेचे हे १० वे वर्ष होते. चेंदा हे केरळ राज्यात उगम पावणारे एक दंडगोलाकार पर्क्यूशन वाद्य आहे. तुळुनाडू (कोस्टल कर्नाटक) मध्ये हे चेंडे म्हणून ओळखले जाते. हे वाद्य केरळमध्ये ३०० वर्षांहून अधिक काळ सर्वात लोकप्रिय प्रकार म्हणून ओळखले जाते. असे हे वाद्य पाहण्याचा व वादन ऐकण्याचा आनंद पुणेकरांना या गणेशोत्सवात घेता आला.



### पुणे फेस्टिव्हलमधील सुलेखन प्रदर्शनाला मोठा प्रतिसाद

पुणे : दैनिक संध्या

महाराष्ट्रातील ५० हून अधिक सुलेखनकारांच्या ३०० हून अधिक सुंदर अक्षरातील कलाकृतींचे प्रदर्शन पुणे फेस्टिव्हल अंतर्गत बालगंधर्व कलादालनात गुरुवार दि. १७ सप्टेंबर रोजी सकाळी १०.०० ते रात्री ८.०० या वेळेत संपन्न झाले. त्यास पुणेकर आणि शाळकरी विद्यार्थांनी फार मोठा प्रतिसाद दिला. अक्षरनंद कॅलीग्राफीच्या वतीने आयोजित या प्रदर्शनाचे उद्‌घाटन पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी पुणे महानगरपालिकेच्या उपायुक्त वसुंधरा बारवे, संथेचे अध्यक्ष प्रमोद पाटील, प्रमोद उमरदंड, सचिन आडेकर अनेक चित्रकला शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी रमणबाग आणि मॉडर्न हायस्कूल या दोन शाळांमधील ५०० हून अधिक विद्यार्थ्यांना सुलेखनाची प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. 'सुलेखन ही कला असून प्रत्येकाचेच अक्षर सुंदर आणि वळणदार असावे. त्यासाठी शाळकरी वयातच विद्यार्थ्यांना सुलेखनाचे प्रशिक्षण द्यावे असे कृष्णकुमार म्हणाले'. यामध्ये १२x१८ इंच आकारात मराठीतील रंगीत सुलेखन कलाकृती सादर झाल्या. तसेच अनेक प्रात्यक्षिके देखील सादर केली गेली.

### 'दगडूशेठ' बाप्पाच्या एकदंतासाठी ५५ हिऱ्यांचा 'सिम्बॉल ऑफ ऑनर'



पुणे : दैनिक संध्या

श्रद्धेला धर्माच्या सीमा नसतात, याचा सुंदर प्रत्यय श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपतीच्या उत्सवात येत आहे. गणरायाच्या 'एकदंत' रूपाला समर्पित विशेष अलंकार गणेशभक्त समर शेख संकल्पनेतून साकारण्यात आला आहे. उत्सवाच्या १३४ वर्षांच्या इतिहासात 'एकदंत' या रूपाला विशेष समर्पित असा अलंकार प्रथमच साकारण्यात आला आहे. अल रझा जेम्स अँड ज्वेल्सचे प्रोप्रायटर समर शेख यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या अलंकाराचे नामकरण 'सिम्बॉल ऑफ ऑनर' असे करण्यात आले आहे. गणरायाच्या 'एकदंत' रूपाला समर्पित हा अलंकार एकतेचे प्रतीक म्हणून साकारण्यात आला आहे. बाप्पाच्या मूर्तीतील 'एकदंत' या वैशिष्ट्याला विशेष समर्पित असा अलंकार असावा, ही संकल्पना समर शेख यांच्या मनात आली. त्यातून या अनोख्या दागिन्याची निर्मिती करण्यात आली. समर शेख म्हणाले, अलंकार साकारण्यासाठी पाच कारागिरांनी दोन महिने मेहनत घेतली. त्यामध्ये एकूण ९.६९ कॅरेट हिऱ्यांचा वापर करण्यात आला असून, तब्बल ५५ हिरे त्यात जडविण्यात आले आहेत. या दागिन्याची बाजारातील अंदाजे किंमत सुमारे ५ लाख रुपये आहे. बाप्पाची सेवा करण्याची आणि त्यांच्या 'एकदंत' रूपाला समर्पित अलंकार साकारण्याची संधी मिळणे, हा आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. बाप्पानेच आम्हाला ही सेवा करण्याची संधी दिली, अशी भावना समर शेख यांनी व्यक्त केली. अल रझा जेम्स अँड ज्वेल्सचे प्रोप्रायटर समर शेख आणि शेख कुटुंबीयांच्या वतीने हा अलंकार साकारण्यात आला आहे. हिंदू-मुस्लिम ऐक्य आणि परस्पर सन्मानाची भावना अधोरेखित करणारा हा अलंकार गणेशभक्तांचे लक्ष वेधून घेत आहे.

### ढगाळ वातावरणामुळे मक्यावर अळी

पुणे : दैनिक संध्या

यावर्षी अल्प पाऊस झाल्याने पुरंदर तालुक्यातील अनेक भागांत पाणीटंचाई निर्माण झाली आहे. त्यातच ढगाळ वातावरण व बदलत्या हवामानामुळे पिकांवर किडींचा प्रादुर्भाव वाढत असल्याने शेतकऱ्यांचा औषध फवारणीचा खर्च वाढला आहे. जनावरांसाठी हिरव्या चाऱ्याकरिता लागवड केलेल्या मका पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव वाढल्याने शेतकरी चिंतेत आहेत. अल्प पावसामुळे जमिनीतील पाणीपातळीत मोठी घट झाली असून, जनावरांना पुरेसा हिरवा चारा उपलब्ध होत नसल्याने शेतकरी अडचणीत आहेत. अशा परिस्थितीत अल्प पाण्यावर मका पीक जगविण्याचा प्रयत्न सुरू असतानाच विविध रोग व किडींचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकऱ्यांसमोरील संकट वाढले आहे. बदलत्या वातावरणाचा शेतीवर आणि पिकांवर विपरीत परिणाम होत असल्याचे चित्र आहे.

# बालभारतीच्या ६० वर्षांच्या शैक्षणिक प्रवासाचा पुणे फेस्टिव्हलकडून गौरव

■ पुणे (दै. संध्या)

"कोठारी आयोगाने प्रत्येक राज्यात स्वतंत्र पाठ्यपुस्तक निर्मिती संस्था असावी, अशी शिफारस केली होती. त्यानंतर बालभारतीचा प्रवास सुरू झाला आणि आज संस्थेने ६० वर्षांचा यशस्वी टप्पा पूर्ण केला आहे." बालभारतीकडून मोठ्या प्रमाणावर विविध १० भाषांमध्ये १० कोटींहून अधिक पाठ्यपुस्तकांची निर्मिती केली जाते. यंदा एकाच वर्षात चार इयत्तांची पुस्तके प्रकाशित करण्याचे ऐतिहासिक काम संस्थेने केले आहे. आधुनिक माध्यमांचा वापर करून पुस्तकांचे प्रभावीपणे प्रसार व वितरण करण्यावरही भर दिला जात आहे. हीरक महोत्सवी वर्षानिमित्त राज्यातील ६६ हजार शाळांमधील विद्यार्थ्यांना सहा पुस्तकांचे संच देण्यात आल्याचे बालभारतीच्या संचालिका अनुराधा ओक यांनी सांगितले. पुणे फेस्टिव्हल तर्फे 'बालभारती'च्या ६० वर्षपूर्तीनिमित्त करण्यात आलेल्या सत्कार प्रसंगी त्या बोलत होत्या.



महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक जडणघडणीत गेली सहा दशके महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ अर्थात 'बालभारती'च्या ६० वर्षांच्या कार्याचा पुणे फेस्टिव्हलतर्फे गौरव करण्यात आला. बालभारतीच्या संचालिका अनुराधा ओक यांचा पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते गुरुवारी सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ज्येष्ठ विचारवंत उल्हास पवार, जनरल सेक्रेटरी व सांस्कृतिक कार्यक्रम मुख्य संयोजक डॉ. सतीश देसाई, विश्वस्त मोहन टिल्लू उपस्थित होते. अनुराधा ओक पुढे म्हणाल्या की "आज मुलांचा स्क्रीन टाइम वाढत असून वाचनाची आवड कमी होत आहे. त्यामुळे मुलांना पुन्हा वाचनसंस्कृतीकडे वळविण्याची गरज आहे. मुल हे आमचे दैवत आहे. 'किशोर' मासिक तोट्यात असले तरी ते कमीत कमी दरात मुलांपर्यंत पोहोचवून त्यांच्यात वाचनाची गोडी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. किशोर आणि बालभारती आता एकरूप झाले आहेत. पाठ्यपुस्तक निर्मितीबरोबरच वाचनसंस्कृती रुजविण्याचे कामही बालभारती करीत आहे," असे त्यांनी नमूद केले. बालभारतीची मोक्याच्या ठिकाणी असलेली जागा जतन करण्यासाठी पुणेकरांनीही पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.'बालभारती'ची स्थापना २७ जानेवारी १९६७ रोजी झाली. मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू, कन्नड, तेलुगू, सिंधी, गुजराती अशा विविध भाषांमध्ये शालेय पाठ्यपुस्तकांची निर्मिती व वितरण करण्याचे काम संस्थेमार्फत केले जाते. असे सांगून त्या म्हणाल्या की, 'राज्यातील लाखो विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाचा अविभाज्य भाग बनलेल्या या संस्थेच्या कार्याचा गौरव पुणे फेस्टिव्हल तर्फे करण्यात आला याचा आनंद आहे. कृष्णकुमार गोयल म्हणाले, "पुणे फेस्टिव्हल केवळ कला-संस्कृती जोपासण्याचे काम करीत नाही, तर कर्तृत्ववान व्यक्ती आणि संस्थांचाही गौरव करतो. बालभारती ही पुण्याची आणि महाराष्ट्राची महत्त्वाची संस्था आहे. राज्याच्या शैक्षणिक व सामाजिक वाटचालीत तिचे योगदान मोठे आहे. आजचा सन्मान केवळ संचालिकेचा नसून बालभारतीतील आजवरच्या सर्व कर्मचारी आणि त्यांच्या अथक परिश्रमांचा आहे. संस्कृती जपायची असेल तर शिक्षण जपावे लागेल आणि शिक्षणाबद्दल अभिमान बाळगावा लागेल."

उल्हास पवार यांनी बालभारतीच्या कार्याचे कौतुक करताना संस्थेला शासनाने अधिक पाठबळ देण्याची गरज व्यक्त केली. "बालभारतीने अनेक भाषांमध्ये दर्जेदार पुस्तके उपलब्ध करून दिली आहेत. साने गुरुजींच्या आंतरभारतीच्या संकल्पनेला प्रत्यक्ष स्वरूप देणारे काम या संस्थेने केले आहे. अनेक नामवंत लेखक, कवी आणि साहित्यिक बालभारतीशी जोडले गेले आहेत. 'पसायदान'चा उर्दू अनुवादही संस्थेने प्रसिद्ध केला आहे. ग्रामीण भागापर्यंत पुस्तके पोहोचविण्याची वितरण यंत्रणाही तितकीच महत्त्वाची आहे. लहानपणापासून विद्यार्थ्यांची सामाजिक व शैक्षणिक जडणघडण करण्याचे मोठे काम बालभारतीने केले आहे," असे पवार म्हणाले.

यावेळी 'किशोर' मासिकाचे संपादक किरण केंद्रे यांचा पुणे फेस्टिव्हलतर्फे, तर उल्हास पवार यांचा बालभारतीतर्फे सन्मान करण्यात आला. बालभारतीतील कर्मचारीवर्गाच्या कमतरतेबाबत मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन विश्वस्त मोहन टिल्लू यांनी दिले. कार्यक्रमाच्या प्रारंभी तन्मयी मेहेंदळे-कुलकर्णी यांनी हंसध्वनी रागातील 'वातापी गणपती' हे गणेशस्तवन सादर केले.



गणपतीच्या पाठोपाठ घरोघरी आज गौरीचे आगमन झाले. महिला उत्साहात त्यांचे स्वागत करत त्यांची पूजा अर्चना करून आपल्या घरात प्रवेश करत सुंदर पैकी अनेक दागदागिन्यांनी सजवत छान साडी परीधान करून त्यांचे स्वागत करत आशीर्वाद घेतले. ( Photo : Sushil Rathod )

## पुण्यातील नवीन एरोस्पेस स्कूल उपक्रमाचा समारोप

■ पुणे (दै. संध्या)

ला फाऊंडेशन डसॉल्ट सिस्टिम्स, इंडियाने आज त्यांच्या "माय फर्स्ट एरोस्पेस प्रोग्राम" या महत्त्वपूर्ण STEM उपक्रमाच्या अंतिम टप्प्याची घोषणा केली; या उपक्रमाची सांगता पुण्यात होत आहे. तरुण पिढीला घडवण्यासाठी आणि अंतराळ क्षेत्राबाबत तसेच त्यासंबंधीच्या वाढत्या शैक्षणिक संधींविषयी त्यांच्यात कुतूहल जागृत करण्यासाठी हा उपक्रम आखण्यात आला होता.

अंतराळ क्षेत्रात कार्यरत असलेली सोसायटी फॉर स्पेस एज्युकेशन रिसर्च अँड डेव्हलपमेंट (SSERD) या ना-नफा तत्त्वावर चालणाऱ्या संस्थेच्या सहकार्याने ला फाऊंडेशन डसॉल्ट सिस्टिम्स, इंडिया हा उपक्रम राबवते आहे. संपूर्ण भारतात हा उपक्रम एक अनुभवात्मक शैक्षणिक मार्ग उपलब्ध करून देतो, जो विद्यार्थ्यांना एका



नियोजनबद्ध मार्गाने मार्गदर्शन करतो. डसॉल्ट सिस्टेम्सच्या कुशल स्वयंसेवकांच्या मदतीने, मूलभूत STEM संकल्पना समजून घेण्यापासून ते त्यांच्या कल्पनांना मूर्त रूप देण्यासाठी 3D तंत्रज्ञानाचा वापर करण्यापर्यंत सहभागी प्रगती करतात. प्रत्यक्ष कृतीतून शिकणे आणि आभासी पडताळणी यांचा मेळ घालून, विद्यार्थी रॉकेटरी, उपग्रह आणि रोव्हरशी संबंधित संपूर्ण उपक्रमांद्वारे महत्त्वपूर्ण समस्या-निवारण, सर्जनशीलता आणि सहयोगी अभियांत्रिकी कौशल्ये विकसित करतात.

## डॉ.तेजस सुधीर नेवसे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यावाचस्पती पदवी प्राप्त

■ पुणे (दै. संध्या)

अनेकांत एज्युकेशन सोसायटी बारामतीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती येथील वनस्पतिशास्त्र संशोधन केंद्राचे संशोधक विद्यार्थी डॉ.तेजस सुधीर नेवसे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी नुकतीच प्राप्त झाली.



डॉ.तेजस नेवसे यांनी क्षारपड शेत जमिनीत वाढणाऱ्या अमरॅनथस स्पाईनोसस या वनस्पतीचा जमिनीची क्षारता कमी करण्यासाठीची उपयुक्तता या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला प्रबंध सादर केला होता. बारामती तालुक्यातील काही ठिकाणी असलेल्या क्षारयुक्त जमिनीमुळे बियांची उगवण क्षमता व रोपांची वाढ खुंटल्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर डॉ.तेजस नेवसे यांनी केलेले संशोधन अत्यंत उपयुक्त व क्षारयुक्त नापिक जमिनीसाठी वरदान ठरेल. या कामी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती येथील वनस्पतिशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. भगवान शंकर माळी मार्गदर्शक म्हणून लाभले. अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह (वाघोलीकर), सचिव मिलिंद शाह (वाघोलीकर), सर्व पदाधिकारी, सर्व विश्वस्त, डॉ.तेजस नेवसे यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

## तृतीयपंथीयांच्या सन्मानासोबत गरजूंसाठी धान्यदान

■ पुणे (दै. संध्या)

समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाची समान संधी मिळावी आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव अधिक व्यापक व्हावी, या उद्देशाने शुक्रवार पेठेतील सेवा मित्र मंडळाच्या वतीने तृतीयपंथीय समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सात तृतीयपंथीयांची धान्यतुला व सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. गणरायाच्या साक्षीने झालेल्या या उपक्रमातून जमा झालेले धान्य अनाथाश्रमाला भेट देण्यात आले.

शुक्रवार पेठेतील सेवा मित्र मंडळ चौकात झालेल्या या कार्यक्रमाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, ज्येष्ठ इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे, सेवा मित्र मंडळाचे अध्यक्ष राजाभाऊ महाडिक, शिरीष मोहिते, रोहन जाधव, ॲड. हेमंत झंजाड, अमर लांडे, सचिन ससाणे, नमन कांबळे, सिद्धार्थ पायगुडे, विक्रांत मोहिते आदी उपस्थित होते.




कार्यक्रमात मंगलमुखी चॅरिटेबल ट्रस्टच्या रंजीता नायक, श्री याल्ल देवदासी संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब कुंभार, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या बी. पन्ना, कादंबरी शेख, डॉ. मिलिंद लबाडे, ऐश्वर्या पांडव, किरण वाघ या तृतीय पंथीयांचा सन्मान करण्यात आला. उपरणे, सन्मानपत्र, श्रीफळ असे सन्मानाचे स्वरूप होते.

डॉ. पराग काळकर म्हणाले, प्रत्येकाला शिक्षणाचा हक्क आहे. विद्यापीठात प्रत्येकाला शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे. म्हणून तृतीयपंथीयांकडून कोणतीही फी न घेता त्यांना शिक्षण दिले जाते. अशा उपक्रमांमधून समाजातील सर्व घटकांना आनंद मिळतो. त्यामुळे अशा उपक्रमांमध्ये संपूर्ण समाजाने सहभागी व्हायला हवे. पांडुरंग बलकवडे म्हणाले, शुक्रवार पेठेतील सेवा मित्र मंडळ आदर्श विचार आणि आचारावर चाललेले आहे. गरजूंसाठी मंडळाच्या वतीने विविध उपक्रम राबविले जातात.

# कुचिपुडीच्या विविध पैलूंचा अभूतपूर्व रंगमंचीय कलाविष्कार

■ पुणे (दै. संध्या)

गणेश कौत्वममधून मंगलाचरण, स्वामी रा रा या शब्दममधून भगवान कृष्णाचे भावपूर्ण चित्रण आणि मरकत मणिमय चेला या तरंगम्मधून ताल, लय व संतुलनाचा प्रत्यय देत सयुजा मुजुमदार हिने आपल्या नृत्यसाधनेचा कलात्मक आविष्कार रंगमंचावर घडवला. नृत्त, भावाभिनय आणि नाट्यमयतेचा सुरेख मिलाफ साधत सादर केलेल्या या रंगप्रवेशम्मध्ये पितळी ताटाच्या कडांवर केलेल्या तरंगम्मधील तालबद्ध हालचाली आणि संतुलनाने रसिकांचे लक्ष वेधले.

समार्चना स्कूल ऑफ डान्स यांच्या वतीने आयोजित या सोहळ्यास प्रमुख अतिथी नृत्य चूडामणी वैजयंती काशी, प्रमुख पाहुण्या नृत्य निपुण प्रतीक्षा काशी, सयुजाच्या गुरू आणि आई नमिता मुजुमदार, गुरु वैभव आरेकर यांच्यासह नृत्य क्षेत्रातील मान्यवर, गुरू, शिक्षक, कुटुंबीय आणि रसिक उपस्थित होते. या रंगप्रवेशम्निमित्त सयुजाला आरिया विद्यापीठाकडून मान्यतेचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात राग आरभि आणि आदि तालातील गणेश कौत्वमने झाली. भगवान गणेशाला वंदन करणाऱ्या या मंगलाचरणातून सयुजाने नृत्याच्या माध्यमातून गणेशाचे



रूप उलगडले. त्यानंतर राग मोहनम् आणि आदि तालातील स्वामी रा रा या शब्दम मध्ये भगवान कृष्णाचे सौंदर्य, मोहक व्यक्तिमत्त्व आणि दैवी गुण भावाभिनयातून साकारले. स्वर, ताल आणि अभिनयाचा सुरेख मेळ या सादरीकरणातून साधण्यात आला.

यानंतर भरतनाट्यम आणि कुचिपुडीमधील हालचालींच्या शैलीतील फरक प्रात्यक्षिकातून स्पष्ट करण्यात आला. समार्चना स्कूल ऑफ डान्सच्या विद्यार्थिनी मल्लिका आणि देविका राजवाडे यांनी अरैमंडीच्या माध्यमातून दोन्ही नृत्यप्रकारांतील शरीराची बैठक, हालचाली आणि प्रवाहीपणातील फरक दाखवून दिला. त्यानंतर मरकत मणिमय चेला या तरंगम्मध्ये सयुजाने कृष्णाचे रूप आणि गुण अभिनयातून साकारत तालबद्ध नृत्य केले. पितळी ताटाच्या कडांवर संतुलन राखत केलेल्या या सादरीकरणाने कार्यक्रमात विशेष रंगत आणली. सयुजाने वयाच्या पाचव्या वर्षी नृत्याचे प्रशिक्षण सुरू केले. भरतनाट्यम आणि कुचिपुडीसोबत योगासने, बॅले आणि समकालीन नृत्याचाही तिने अभ्यास केला आहे. कुचिपुडीचे प्राथमिक प्रशिक्षण नमिता मुजुमदार यांच्याकडून घेतल्यानंतर नृत्य चूडामणी वैजयंती काशी यांच्या मार्गदर्शनाखाली तिच्या प्रशिक्षणाला अधिक व्यापक दिशा मिळाली.

## थोडक्यात पण महत्वाचे



## शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर प्रा. नंदकुमार सागर यांनी वेधले जिल्हाधिकाऱ्यांचे लक्ष

**सातारा : दैनिक संध्या**

सातारा जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आज पुणे विभाग शिक्षक मतदार संघाचे उमेदवार प्रा. नंदकुमार सागर यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक शिष्टमंडळाने मा. जिल्हाधिकारी, सातारा यांना निवेदन सादर केले. यावेळी, संजय यादव, आर. वाय. जाधव, कल्याण शिंदे, सुधाकर जगदाळे, हनुमंत पवार, भरत मोजर, सतीश पिसाळ, तानाजी मिसाळ, राजश्री पवार,विलास गगनमाले,हे उपस्थित होते.सातारा जिल्ह्यातील वाई, कराड, पाटण, जावली, फलटण, कोरेगाव व महाबळेश्वर तालुक्यातील ३० हून अधिक शिक्षक प्रतिनिधी उपस्थित होते. निवेदनात प्रामुख्याने तीन प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत : १. जिल्ह्यातील अंशतः व विनाअनुदानित शाळांना तात्काळ १००% अनुदान लागू करावे. २. २००५ नंतर सेवेत आलेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना (OPS) लागू करावी. ३. शिक्षकांची प्रलंबित वैद्यकीय देयके, सातव्या वेतन आयोगाचा हप्ता व शालार्थ आयडीच्या तांत्रिक अडचणी त्वरित सोडवाव्यात. 4 RTA 2009कायद्याच्या अगोदर सेवेत असलेल्या शिक्षकांना TET लागू करू नये. 5 संच मान्यतेचे अन्याय कारक निर्णय बदलावेत 6.पोर्टल द्वारे तत्वरित 100 % पदांची मान्यता दयावी. 7)1 नोव्हेंबर 2005 पूर्वीचे 26900शिक्षक -शिक्षककेतर कर्मचाऱ्यांना विना अट पेन्शन देणे गरजेचे. यावेळी बोलताना प्रा. नंदकुमार सागर म्हणाले, "सातारा जिल्हा हा शिक्षकांचा जिल्हा आहे. येथील शिक्षक गेल्या अनेक वर्षांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. गेल्या ३० वर्षांपासून मी शिक्षकांच्या प्रश्नांसाठी लढत आलो आहे. जिल्हाधिकारी महोदयांनी आमच्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला असून, शासन स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले आहे. शिक्षकांच्या हक्कासाठी हा लढा असाच सुरू राहील." जिल्हाधिकाऱ्यांनी निवेदनाचा स्वीकार करून योग्य कार्यवाहीचे आश्वासन दिले.

## परिस्थिती माझी प्रेरणा त्यातून घडलो - न्यायाधीश मंगेश धोत्रे



**नारायणगाव : दैनिक संध्या**

हुतात्मा राजगुरू शिक्षण प्रसारक मंडळाचे सरसेनापती हंबीरराव मोहिते विधी महाविद्यालय, राजगुरुनगर येथे माजी विद्यार्थी आणि स्पर्धा परीक्षेतून पहिल्याच प्रयत्नात न्यायाधीश पदी निवड झालेले मंगेश आनंद धोत्रे यांनी "विधी विद्यार्थी ते न्यायाधीश" यशस्वी प्रवास या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी न्यायाधीश मंगेश धोत्रे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी भिती सोडून अभ्यास केला तर अशक्य काही नाही. परिस्थिती माझी प्रेरणा आहे त्यातून घडलो. तसेच न्यायाधीश पदासाठी एमपीएससी मार्फत घेण्यात येणाऱ्या प्री, मेन्स आणि मुलाखत या परीक्षेचे स्वरूप, प्रश्न, याविषयी सविस्तर माहिती देत अनुभव सांगितले. यावेळी प्राचार्य शिंदे म्हणाले की, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी न्यायाधीश झाले याचा आपल्या संस्था, महाविद्यालय, प्राध्यापक यांच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. इतर विद्यार्थ्यांनी आदर्श घेऊन अभ्यास करून यश संपादन करावे असे आवाहन करत शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, खजिनदार सुरेखाताई मोहिते पाटील, सचिव शिवाजीराव मोहिते पाटील, प्राचार्य डॉ.किरण शिंदे, परीक्षा विभागप्रमुख प्रा.किरण काळे, प्रा. संदीप तायडे, प्रा. प्राजक्ता घोलप, प्रा. सलोनी वाडेकर, प्रा.अभिजीत वैद्य, प्रा.विद्या पवार, प्रा. विनय राऊत, प्रा.ज्योती सांडभोर यांसह शिक्षकेतर कर्मचारी, विधी महाविद्यालयाचे एल.एल.बी व बी.ए.एल.एल.बी.चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आधार हाउसिंग फायनान्सचा तीन नवीन शाखांसह विस्तार

**शहरातील एकूण शाखांची संख्या १८ वर पोहोचली**

■ पुणे (दै. संध्या)

आधार हाउसिंग फायनान्स लिमिटेडने (एएचएफएल) पुणे शहरात तीन नवीन शाखांच्या उद्घाटनाची घोषणा केली आहे. या नवीन शाखा बावधन, शिक्रापूर आणि सासवड येथे सुरू करण्यात आल्या आहेत. या विस्तारामुळे पुण्यातील कंपनीच्या एकूण शाखांची संख्या १८ वर पोहोचली आहे, तसेच देशभरातील नेटवर्क ६३० हून अधिक शाखांपर्यंत विस्तारले आहे. या नवीन शाखांमुळे या भागातील ग्राहकांसाठी आधारची पोहोच अधिक सुलभ होईल, तसेच अल्प उत्पन्न गट (एलआयजी) आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्ल्यूएस) कुटुंबांना परवडणारे गृहकर्ज प्रदान करण्याप्रती कंपनीची कटिबद्धता अधिक दृढ होईल.

तिन्ही ठिकाणी उद्घाटन समारंभ पार पडले. या कार्यक्रमांना चीफ ऑपरेटिंग ऑफिसर श्री. अनिल नायर, चीफ बिझनेस लीडर श्री. सत्यम वर्मा आणि कंपनीचे इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पुण्यातील निवासी बाजारपेठ सातत्याने प्रगती करत आहे, रोजगाराच्या नवीन संधी, पायाभूत सुविधांचा विकास आणि निवासी क्षेत्रांचा विस्तार याला हातभार लावत आहे. जून २०२६ अखेर संपलेल्या १२ महिन्यांत शहरातील घरांची विक्री वार्षिक ७ टक्के वाढ होऊन ९२,३४१ युनिट्सवर पोहोचली, तर नवीन निवासी प्रकल्पांच्या लॉंचमध्ये १४ टक्के वाढ होऊन १,०१,०८५ युनिट्सवर गेली. घरांच्या विक्री आणि लॉंचमधील ही वाढ प्रस्थापित, तसेच नव्याने विकसित होणाऱ्या भागांमधील घरांची सातत्यपूर्ण मागणी दर्शवते, तसेच स्वतःचे घर घेण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांसाठी परवडणाऱ्या गृहकर्जाचे महत्त्व स्पष्ट करते.

आधार हाउसिंग फायनान्स लिमिटेडचे मॅनेजिंग डायरेक्टर आणि सीईओ श्री. रिषी आनंद म्हणाले, "पुण्याचा विकास विविध उत्पन्न गट आणि नव्याने विकसित होणाऱ्या भागांमध्ये घर खरेदीदारांची नवीन लाट निर्माण करत आहे. आमच्या नवीन शाखा स्थानिक बाजारपेठेची जाण, सुलभ गृहकर्ज आणि ग्राहक-केंद्रित दृष्टिकोन यांची सांगड घालून जबाबदारीने या संधीचा लाभ घेण्याच्या दिशेने पाऊल आहे."



आधार हाउसिंग फायनान्स लिमिटेडचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर श्री. अनिल नायर म्हणाले, "या भागातील आमच्या अनुभवाद्वारे आम्हाला स्थानिक समुदायांच्या गृहकर्जाच्या गरजांबाबत सखोलपणे समजले आहे. बाजारपेठेबाबत ही माहिती आम्हाला विविध उत्पन्न गटांतील ग्राहकांसाठी त्यांच्या गरजेनुसार सानुकूलित सोल्यूशन्स प्रदान करण्यास सक्षम करते. या नवीन शाखा ग्राहकांशी आमचे संबंध अधिक दृढ करतील आणि स्वतःचे घर घेऊ इच्छिणाऱ्यांशी अधिक जवळून संवाद साधण्याची संधी देतील, तसेच घर खरेदी करणे अधिक सुलभ बनवण्याच्या आमच्या कटिबद्धतेला अधिक दृढ करतील."

> २२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये दृढ उपस्थितीसह, आधार हाउसिंग फायनान्स लिमिटेड गृहकर्ज सेवांपासून वंचित असलेल्यांपर्यंत पोहोचण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे. प्रथम, द्वितीय व तृतीय श्रेणीच्या शहरांमधील आपल्या कामकाजाच्या माध्यमातून कंपनी विशेषतः अल्प उत्पन्न गट आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमधील स्वतःचे घर घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींना पाठबळ देण्यासाठी कटिबद्ध आहे.

# रिअल इस्टेट क्षेत्र आणि सरकारमध्ये थेट संवाद




■ पुणे (दै. संध्या)

क्रेडाई महाराष्ट्रच्या वतीने 'क्रेडाई महाराष्ट्र मॅनेजिंग कमिटी आणि क्रेडाई महा संवाद मीटिंग 2026'चे आयोजन 27 ऑगस्ट 2026 रोजी पुण्यातील हयात रीजन्सी येथे करण्यात आले. या एकदिवसीय कार्यक्रमात महाराष्ट्रातील 45 शहरांमधून 300 हून अधिक क्रेडाई सदस्यांनी सहभाग घेतला. रिअल इस्टेट क्षेत्रासमोरील प्रशासकीय, तांत्रिक, नियामक आणि धोरणात्मक अडचणी वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांसमोर थेट मांडून त्यांच्या व्यावहारिक उपाययोजनांवर चर्चा करणे हा महासंवादाचा प्रमुख उद्देश होता. कार्यक्रमाचे नेतृत्व क्रेडाई महाराष्ट्रचे अध्यक्ष श्री. प्रफुल्ल तावरे यांनी केले. यावेळी मानद सचिव श्री. आशीष पोखरणा यांच्यासह क्रेडाई महाराष्ट्रचे माजी अध्यक्ष, पदाधिकारी आणि राज्यातील विविध शहरांतील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. रजिस्ट्रेशन आणि स्टॅम्प विभागाच्या सत्रात रजिस्ट्रेशन महानिरीक्षक व कंट्रोलर ऑफ स्टॅम्प्स श्री. रवींद्र बिनवाडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ऑनलाइन रजिस्ट्रेशन सर्व्हिसेस, डिजिटायझेशन, एएसआर, रजिस्ट्रेशन आणि स्टॅम्प ड्युटी याबाबत माहिती देण्यात आली. एएसआरमधील फुटनोट्समुळे विकासकांना येणाऱ्या अडचणी तसेच डिजिटायझेशनदरम्यान 7/12 उतारे आणि प्रॉपर्टी कार्डमध्ये होणाऱ्या चुका जलद व सोप्या पद्धतीने दुरुस्त करण्याची गरज यावर चर्चा झाली. सेटलमेंट कमिशनर व डायरेक्टर ऑफ लँड रेकॉर्ड्स श्री. शैलेश नवाल यांच्या उपस्थितीत ई-मोजणी, 7/12, ऑनलाइन 7/12, प्रॉपर्टी कार्ड, म्युटेशन/फेरफार, सिटी सर्व्हे आणि डिजिटल लँड रेकॉर्ड्स यावर मार्गदर्शन करण्यात आले. विक्रीखत झाल्यानंतर म्युटेशन/फेरफार प्रक्रिया जलद करण्याची मागणी क्रेडाई सदस्यांनी केली. विभाग आणि क्रेडाई महाराष्ट्र यांच्यात नियमित संवाद व बैठका आयोजित करण्याची गरजही अधोरेखित करण्यात आली. महारेरा सत्रात महारेरा सचिव श्री. प्रकाश साबळे यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रोजेक्ट रजिस्ट्रेशन, डॉक्युमेंटेशन, कम्प्लायन्स, क्यूआरपी, महारेरा 1.0 ते महारेरा 2.0 मायग्रेशन, ऑक्युपन्सी सर्टिफिकेट, प्रोजेक्ट करेक्शन आणि कन्व्हेयन्स याबाबत मार्गदर्शन केले.

# एएम/एनएस इंडियाला बीआयएस परवाने

## विशेष पोलाद क्षेत्रातील नेतृत्वाला बळ

■ सुरत (दै. संध्या)

> ■ क्यू अँड टी प्लेट्स आणि झिंक-ॲल्युमिनियम-मॅग्नेशियम कोटेड पोलादासाठी परवाना मिळवणारी देशातील पहिली उत्पादक कंपनी

आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (एएम/एनएस इंडिया) ने आयएस २०६२ (भाग २):२०२६ आणि आयएस १९२१०:२०२५ या दोन महत्त्वपूर्ण मानकांसाठी भारतीय मानक ब्युरोचे (बीआयएस) परवाने मिळवले आहेत. आयएस २०६२ (भाग २):२०२६ या नव्याने लागू झालेल्या मानकासाठी अखिल भारतीय स्तरावरील पहिले बीआयएस परवाना मिळवणारी कंपनी ठरल्याचा दावा एएम/एनएस इंडियाने केला आहे.

या मान्यतांमुळे कंपनीच्या विशेष पोलाद उत्पादनांच्या श्रेणीत वाढ होणार असून, पायाभूत सुविधा, संरक्षण, अवजड अभियांत्रिकी आणि औद्योगिक क्षेत्रांसाठी देशांतर्गत स्तरावर उच्च-मूल्याची पोलाद उत्पादने उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. तसेच आयातीतून होणारी पोलादाची गरज कमी करण्यासही यामुळे हातभार लागण्याची अपेक्षा आहे. आयएस २०६२ (भाग २):२०२६ या मानकात हॉट रोल्ड क्वेन्च्ड अँड टेम्पर्ड (क्यू अँड टी) पोलादाच्या प्लेट्स, शीट्स, स्ट्रिप्स आणि वाइड फ्लॅट्सचा समावेश आहे. विशेष उष्णता उपचार प्रक्रियेतून तयार होणाऱ्या क्यू अँड टी पोलादामध्ये उच्च मजबुती आणि टिकाऊपणा असतो. त्यामुळे तुलनेने कमी वजनाच्या आणि अधिक भार सहन करू शकणाऱ्या संरचना उभारणे शक्य होते. या पोलादाचा वापर पूल, अवजड अभियांत्रिकी उपकरणे, खाणकामातील यंत्रसामग्री, सागरी व समुद्रातील संरचना तसेच विविध औद्योगिक क्षेत्रांत केला जातो. देशांतर्गत उत्पादनामुळे यापूर्वी आयातीवर अवलंबून असलेल्या काही बाजारपेठांच्या गरजा पूर्ण करण्यास मदत होणार आहे.

# उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेची 'नथिंग स्मॉल अबाऊट अस' जाहिरात मोहीम सुरू

■ नवी दिल्ली (दै. संध्या)




> ■ आर. माधवन ब्रँड ॲम्बेसेडर; बँकेच्या व्यापक सेवा आणि विस्ताराची नव्या मोहिमेतून मांडणी

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडने प्रसिद्ध अभिनेते आणि पद्मश्री पुरस्कारप्राप्त आर. माधवन यांना ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्त करत 'नथिंग स्मॉल अबाऊट अस' ही नवीन ब्रँड जाहिरात मोहीम सुरू केली आहे. २६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये ८०० हून अधिक शाखांच्या माध्यमातून एक कोटीहून अधिक ग्राहकांना सेवा देणाऱ्या बँकेने आपल्या बदलत्या स्वरूपाची आणि व्यापक बँकिंग सेवांची माहिती ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ही मोहीम आखली आहे. 'स्मॉल' या शब्दामुळे बँकेच्या सेवा, कर्जाची रक्कम किंवा विस्तार मर्यादित असल्याची धारणा निर्माण होऊ शकते. ही धारणा बदलण्याचा प्रयत्न या मोहिमेतून करण्यात आला आहे. बचत, ठेवी, वित्तपुरवठा, व्यवसाय बँकिंग, परकीय चलन व्यवहार, अनिवासी भारतीय सेवा, गुंतवणूक आणि संपत्ती व्यवस्थापन अशा विविध सेवा बँकेकडून उपलब्ध करून दिल्या जातात. बँकेच्या कर्ज सुविधांमध्ये ६ हजार रुपयांपासून २५० कोटी रुपयांपर्यंतच्या कर्जांचा समावेश असल्याचे उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने म्हटले आहे. त्यामुळे विविध स्तरांवरील ग्राहकांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी बँकेच्या सेवा उपलब्ध असल्याचा संदेश मोहिमेतून देण्यात आला आहे.

# भारताच्या १०० गिगावॅट पवन ऊर्जा उद्दिष्टाला बळ

> ■ विंडर्जी इंडिया २०२६ मध्ये उत्पादन, सागरी पवन ऊर्जा आणि पुनर्बांधणीवर भर
>
> ■ पवन ऊर्जा क्षेत्राने ५८.५२ गिगावॅटचा टप्पा ओलांडला; ७ ते ९ ऑक्टोबरदरम्यान चेन्नईत आठवी आवृत्ती

■ चेन्नई (दै. संध्या)

भारताचे पवन ऊर्जा क्षेत्र स्वच्छ ऊर्जेच्या उद्दिष्टांसोबतच उत्पादन, निर्यात आणि ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण औद्योगिक क्षेत्र म्हणून वेगाने विस्तारत आहे. या पार्श्वभूमीवर विंडर्जी इंडिया २०२६ या पवन ऊर्जा व्यापार मेळावा व परिषदेच्या आठव्या आवृत्तीचे आयोजन ७ ते ९ ऑक्टोबर २०२६ दरम्यान चेन्नई ट्रेड सेंटर येथे करण्यात येणार आहे. 'पवन – भारताच्या ऊर्जा लवचिकतेला बळ देणे' या संकल्पनेवर आधारित या आयोजनात देशाच्या पवन ऊर्जा क्षेत्रातील उत्पादन क्षमता, निर्यात, सागरी पवन ऊर्जा, जुन्या प्रकल्पांचे पुनर्बांधणीकरण, कौशल्यविकास आणि पुरवठा साखळी यांसारख्या विषयांवर चर्चा होणार आहे. केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाचे सहसचिव राजेश कुलहरी म्हणाले की, भारताचे ऊर्जा संक्रमण केवळ नवीन वीज क्षमता उभारण्यापुरते मर्यादित नसून, रोजगारनिर्मिती, उत्पादन निर्यात, ऊर्जा सुरक्षा आणि जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करणारी व्यापक औद्योगिक परिसंस्था उभारण्याच्या दिशेने सुरू आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये भारताने ६.०५ गिगावॅट पवन ऊर्जा क्षमता नव्याने जोडली. आतापर्यंतची ही सर्वाधिक वार्षिक वाढ ठरली आहे. त्यामुळे ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत देशाची एकूण स्थापित पवन ऊर्जा क्षमता ५८.५२ गिगावॅट झाली आहे. देशाने २०३० पर्यंत १०० गिगावॅट पवन ऊर्जा क्षमता गाठण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी दरवर्षी सुमारे १० गिगावॅट क्षमतेची सातत्यपूर्ण वाढ आवश्यक ठरणार आहे. सध्या सुमारे ४३ गिगावॅट क्षमतेचे प्रकल्प बांधकामाधीन असल्याने या विस्ताराला आधार मिळत आहे. भारतीय पवन टर्बाइन उत्पादक संघटनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य प्यासी यांनी सांगितले की, पुढील टप्प्यात उच्च क्षमतेच्या पवन टर्बाइनसह देशांतर्गत उत्पादन क्षमता आणि महत्त्वाच्या घटकांचे स्वदेशीकरण वाढवणे आवश्यक आहे. पुरवठा साखळी मजबूत करणे, देशांतर्गत उत्पादन क्षमता वाढवणे आणि मोठ्या प्रमाणावर उत्पादनाला चालना देणे यासाठी उत्पादक, घटक निर्माते, तंत्रज्ञान पुरवठादार आणि सरकार यांच्यात समन्वय आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.


## महाराष्ट्र शासन-जलसंपदा विभाग

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे- ०११

Budgetary Notice No.०४/२०२६-२७

Portal- https://wrd.maharashtra.gov.in

कार्यकारी अभियंता उजनी जलविद्युत विभाग इंदापूर जिल्हा-पुणे यांचेकडून विद्युत कामांचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. त्याबाबतचा सविस्तर तपशील Portal- https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर कामांसंबंधित तांत्रिक वर्णन, प्रपत्रे, अटी व शर्ती इत्यादी माहिती दिनांक १८/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजलेपासून ते दिनांक २५/०९/२०२६ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत वरील संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

कार्यकारी अभियंता
उजनी जलविद्युत विभाग
इंदापूर जिल्हा-पुणे
ई-मेल- ujjanihydroindapur@yahoo.in

क्रमांक : आरओसी-2026-27/क्र-5/C२९१७


# सिग्निफाय तर्फे लालबागच्या राजाच्या चरणी उर्जा बचत करणारी उपकरणे

■ मुंबई (दै. संध्या)

सिग्निफाय (युरोनेक्स्ट: लाईट) या लायटिंग क्षेत्रातील जगभरांतील आघाडीच्या कंपनीतर्फे त्यांचे उर्जा वाचवणाऱ्या पंख्यांचे तंत्रज्ञान येत्या गणेश चतुर्थीला लालबागच्या राजाच्या चरणी आणले आहे. मुंबईतील गणेश भक्त हे बाप्पाचा आशीर्वाद घेण्यासाठी प्रवास करत असतानाच, इकोलिंकच्या हा एअरफ्लो फॅन्सची जोडणी ही मांडवासह दर्शन रांगेत बसवल्याने आता त्यांचा दर्शनाचा प्रवास हा गारेगार आणि अधिक आरामदायक होणार आहे. अनेक भक्त हे दर्शनाचा अनुभव घेण्यासाठी दूरवरुन येत असतात आणि रांगेत उभे राहून त्यांना गर्दीत वेळ घालवावा लागतो. इकोलिंक फॅन्स मुळे हा अनुभव अधिक चांगला होऊन दर्शनरांगेत उभे राहून गारव्याचा अनुभव घेऊ शकतील. या जोडण्यांमध्ये चार इकोलिंक फॅन्सची मॉडेल्स असून यामध्ये एअरोज्वेल, एअरोट्रियो, एअरोक्रिस्टल आणि एअरोक्वॉड ३ बी आहेत. हे फॅन्स ब्रशलेस डायरेक्ट करंट (बीएलडीसी) तंत्रज्ञानाने युक्त आहेत. बीएलडीसी फॅन्स हे परंपरागत इंडक्शन मोटर्स फॅन्सच्या तुलनेत जे साधारणपणे ७५-८० वॉट्स उर्जेचा वापर करतात त्यांच्या तुलनेत ५० टक्क्यांपर्यंत बचत होते. दहा दिवस चालणाऱ्या या महोत्सवात हे फॅन्स २४ तास सुरु राहतील आणि अंदाजे ४२०० युनिट्स वीजेचा वापर करतील. या बचत करणाऱ्या पंख्यांच्या तंत्रज्ञानाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर जनतेसाठी केल्यामुळे सणासूदीच्या दिवसात भक्तांसाठी आराम सुध्दा प्राप्त झाला आहे.




यावेळी बोलतांना सिग्निफाय ग्रेटर इंडियाच्या हेड स्ट्रॅटेजी ॲन्ड मार्केटिंग चे प्रमुख निखिल गुप्ता यांनी सांगितले "गणेश चतुर्थीला अनेक लोक एकत्र येतात आणि सिग्निफाय मध्ये आम्हाला आमचे नाविन्य हे खऱ्या जीवनात आणून त्यांचा अनुभव देण्याची मोठी संधी प्राप्त झाली आहे. इकोलिंक बीएलडीसी फॅन्स मुळे आम्ही उर्जा बचत करणारा थंडावा लालबागचा राजा येथे आणून भक्तांचा दर्शनाचा प्रवास अधिक आरामदायक करु इच्छित आहोत."

इकोलिंकची उपस्थिती लालबागच्या राजाच्या अनुभवाच्या महत्वपूर्ण विभागात विस्तारलेली आहे, यामध्ये संपूर्ण स्थळावर मोठे होर्डिंग्ज, ड्रॉप-डाउन्स, लिलिपुट्स आणि इतर दृश्यमान घटकांसारख्या ब्रॅंडिंग साधनांचा समावेश आहे. ही ब्रॅंड उपस्थिती इकोलिंकच्या ऊर्जा-कार्यक्षम कुलिंगच्या संकल्पनेला बळकटी देते, तसेच संपूर्ण मांडव आणि रांगेच्या ठिकाणी ग्राहकांशी संवाद साधण्यासाठी अनेक संपर्क बिंदू निर्माण करते. इकोलिंकचा अनुभव स्थळाच्या पलीकडे नेण्यासाठी, अभ्यागतांना खरेदी करण्यासाठी वैयक्तिक हातातील पंखे देखील उपलब्ध असतील.


## ग्रामपंचायत कोथळे, ता. पुरंदर, जि.पुणे

B-1 टेंडर नोटीस क्र.१ सन २०२६/२७

ग्रामपंचायत कोथळे, ता. पुरंदर, जि पुणे यांचेकडुन खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा पद्धतीने जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निवेदेचा नमुना ग्रामपंचायत कोथळे ता. पुरंदर जि. पुणे यांच्याकडुन दिनांक १९/०९/२०२६ ते दिनांक २६/०९/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यत देण्यात येतील व पोस्टाने / समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी /ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निवीदा विक्री करण्याचा कालावधी | निवीदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | घनकचरा व्यवस्थापन साठी टाकी बांधणे. | १९८०१०/- | दि १९/०९/२०२६ ते दि २६/०९/२०२६ | २३६/- | १९८०/- |
| २ | कोथळे अंतर्गत बंदिस्त गटर करणे. | १९९९६८/- | | २३६/- | २०००/- |

निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे : १. कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे. २. कोऱ्या निविदा फी व इसारा रक्कम ग्रामपंचायत कोथळे PDCC बँक शाखा जेजुरी खाते क्र. ०२६००२५००००००१७ वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्या नंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३.जि.प. रजिस्ट्रेशन, PAN कार्ड, GST certificate व या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत कोथळे यांनी राखुन ठेवला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी　　　सरपंच
ग्रामपंचायत कोथळे ता पुरंदर जि पुणे

## थोडक्यात पण महत्वाचे



### तरुणाने देखाव्यातून दिला अजितदादांच्या आठवणींना उजाळा

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी चिंचवडमधील गणेशोत्सवात यंदा एका तरुणाने साकारलेल्या अनोख्या देखाव्याची सर्वत्र चर्चा रंगली आहे. मायक्रोबायोलॉजी विषयाचे शिक्षण घेणाऱ्या दर्शन सोनवणे या तरुणाने स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आठवणींना उजाळा देणारी हुबेहूब प्रतिकृती साकारून त्यांना अनोखी आदरांजली वाहिली आहे. हा देखावा सध्या नागरिकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. गणेशोत्सवाशी अजितदादा पवार यांचे विशेष नाते होते. दरवर्षी ते शहरातील अनेक गणेश मंडळांना भेट देत बाप्पाचे दर्शन घेत असत. त्यांच्या निधनानंतर यंदाचा गणेशोत्सव प्रथमच त्यांच्या अनुपस्थितीत साजरा होत असल्याने अनेक कार्यकर्ते आणि नागरिक भावूक झाले आहेत. हीच भावना जपण्यासाठी दर्शन सोनवणे यांनी आपल्या कल्पकतेतून आणि कलागुणांतून हा विशेष देखावा उभारला आहे. विशेष म्हणजे, दर्शन यांचा राजकारणाशी कोणताही संबंध नसून त्यांनी केवळ आपल्या आवडत्या नेत्याबद्दलच्या आदरातून हा उपक्रम हाती घेतला. अजितदादा पवार यांच्या वाढदिवसापासून सलग तीन महिने मेहनत घेत त्यांनी बाप्पाचे स्वागत करणाऱ्या अजितदादांची जिवंत भासणारी प्रतिकृती तयार केली. तसेच त्यांच्या निधनाशी संबंधित विमान अपघाताचा प्रसंगही या देखाव्यात संवेदनशीलपणे साकारण्यात आला आहे. हा देखावा पाहण्यासाठी परिसरातील नागरिक, गणेशभक्त आणि युवक मोठ्या संख्येने भेट देत आहेत. अनेक जण प्रतिकृतीसोबत छायाचित्रे काढत असून अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा देणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक करत आहेत. दर्शन सोनवणे यांच्या या कलात्मक उपक्रमामुळे गणेशोत्सवात भावनिक आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले असून त्यांच्या मेहनतीची आणि कलाकृतीची सर्वत्र प्रशंसा होत आहे.

### नॉव्हेल इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद

पिंपरी : दैनिक संध्या

महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे पुणे दौऱ्यावर असताना त्यांनी चिंचवड येथील 'नोव्हेल इंटरनॅशनल स्कूल'ला सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी आयोजित विशेष कार्यक्रमात त्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधत त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. शालेय विद्यार्थ्यांना प्रशासकीय व शासन व्यवस्थेची जवळून ओळख व्हावी आणि त्यांच्या प्रगल्भ प्रश्नांना थेट उत्तरे मिळावीत, या उद्देशाने 'नॉव्हेल इंटरनॅशनल स्कूल'मध्ये या विशेष संवाद कार्यक्रमाचे आयोजन नोव्हेल ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे संस्थापक-अध्यक्ष तथा आमदार अमित गोरखे यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी महसूल मंत्री बावनकुळे यांनी विद्यार्थ्यांशी अत्यंत मनमोकळा संवाद साधत त्यांच्या मनात असलेल्या विविध शासकीय व प्रशासकीय प्रश्नांचे निरसन केले. विद्यार्थ्यांच्या या जिज्ञासा आणि डिजिटल सुधारणांसंदर्भातील कल्पक सूचनांचे मंत्र्यांनी विशेष कौतुक केले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी महसूल विभागाशी संबंधित विविध प्रश्न विचारून मंत्र्यांशी संवाद साधला. एका विद्यार्थ्याने जन्म दाखला (बर्थ सर्टिफिकेट), रहिवासी दाखला (डोमिसाईल) आणि राष्ट्रीयत्व (नॅशनॅलिटी) प्रमाणपत्रा मिळण्याचा कालावधी कमी करण्यात यावा, अशी मागणी केली. तसेच आणखी एका विद्यार्थिनीने, रेशन कार्ड डिजिटल करून मोबाईलवर उपलब्ध करून देण्याची सूचना केली. विद्यार्थ्यांच्या या अभ्यासपूर्ण आणि प्रगल्भ प्रश्नांना उत्तर देताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे भरभरून कौतुक केले. ते म्हणाले, 'शासनाच्या आयटी विभागामार्फत डेटा सेंटर आणि डिजिटल प्रणालीचा वापर वाढवण्याचे काम वेगाने सुरू आहे. रेशन कार्ड डिजिटल स्वरूपात मोबाईलवर उपलब्ध करून देण्याच्या सूचनेवर शासन आधीच काम करत असून, येत्या काळात ही सुविधा नागरिकांसाठी पूर्णत्वास येईल.' प्रशासकीय कामांमध्ये तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करून सर्वसामान्यांचे जीवन सुकर करण्याचा शासनाचा मानस असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.



### पिंपरी चिंचवडमध्ये 'चाईल्ड फ्रेंडली बस' उपक्रमाचा पोलीस आयुक्तांच्या हस्ते शुभारंभ

पिंपरी : दैनिक संध्या

बालकांच्या सुरक्षिततेसह त्यांच्या हक्कांबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या पुढाकारातून सुरू करण्यात आलेल्या 'चाईल्ड फ्रेंडली बस' उपक्रमाचा शुभारंभ पोलीस आयुक्तालयात उत्साहात पार पडला. पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या हस्ते बसचे उद्घाटन करण्यात आले. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या संकल्पना व मार्गदर्शनाखाली विशेष बाल पोलीस पथक आणि होप फॉर दि चिल्ड्रेन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे. उद्घाटन प्रसंगी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सदस्य शुभांगी तांबट तसेच होप फॉर दि चिल्ड्रेन फाउंडेशनच्या संस्थापक डॉ. कॅरोलीन उपस्थित होत्या. यावेळी बोलताना पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी बालकांच्या संरक्षणासाठी समाजातील प्रत्येक घटकाने संवेदनशीलता आणि जबाबदारीने काम करण्याची गरज व्यक्त केली. बालकांसाठी सुरक्षित, संवेदनशील आणि बालस्नेही वातावरण निर्माण करण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून विविध उपक्रम सातत्याने राबविले जात असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी पोलीस आयुक्त चौबे यांच्या हस्ते 'चाईल्ड फ्रेंडली बस'ला हिरवा झेंडा दाखवून जनजागृती मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. ही बस पिंपरी चिंचवड शहरातील विविध भागांमध्ये फिरून बालहक्क संरक्षण, सुरक्षित बालपण आणि बालकांशी संबंधित विविध विषयांवर जनजागृती करणार आहे. 'बालस्नेही शहर' अभियानांतर्गत सुरू करण्यात आलेला हा उपक्रम बालकांच्या सुरक्षिततेसाठी आणि समाजामध्ये बालहक्कांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# भोसरीतील 'ओपन बार'ला पोलिसांचा दणका!

## पीएमटी चौकातील १८ टपऱ्या हटविल्या; १७९ गुन्हे दाखल

■ पिंपरी : (दै. संध्या)

रस्त्यालगतच्या टपऱ्यांवर उघड्यावर मद्यपान करण्यासाठी जागा आणि साहित्य उपलब्ध करून देत निर्माण झालेल्या 'ओपन बार' संस्कृतीविरोधात भोसरी पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

पीएमटी चौक परिसराची पाहणी करून अशा प्रकारचे 'हॉटस्पॉट' निश्चित करण्यात आले. त्यानंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाच्या मदतीने बुधवारी (दि. १६) संयुक्त कारवाई करत १८ अनधिकृत टपऱ्या हटविण्यात आल्या.



पीएमटी चौक हा भोसरीतील वर्दळीचा परिसर आहे. दिवसभर येथे कामगार, महिला, पादचारी आणि स्थानिक नागरिकांची मोठी ये-जा असते. मात्र, काही टपऱ्यांच्या आसपास सायंकाळनंतर उघड्यावर मद्यपान करणाऱ्यांची गर्दी होत असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे वारंवार येत होत्या.

काही टपरीचालकांकडून मद्यपींना बसण्यासाठी जागा, ग्लास तसेच इतर आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिले जात असल्याचेही पोलिसांच्या निदर्शनास आले. या तक्रारींची दखल घेत भोसरी पोलिसांनी परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. कोणत्या ठिकाणी उघड्यावर मद्यपानाचे प्रकार वारंवार घडतात, कोणत्या टपऱ्यांभोवती मद्यपींची गर्दी होते आणि त्यामुळे नागरिकांना कुठे त्रास सहन करावा लागतो, याची माहिती गोळा करण्यात आली. त्यानंतर संबंधित ठिकाणे 'हॉटस्पॉट' म्हणून निश्चित करून कारवाईचे नियोजन करण्यात आले.

महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकासह पोलिसांनी पीएमटी चौक परिसरातील रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या अनधिकृत टपऱ्यांवर कारवाई केली. मद्यपानासाठी जागा उपलब्ध करून देणाऱ्या १८ टपऱ्या हटविण्यात आल्या. या कारवाईमुळे रस्त्यालगतचा परिसर मोकळा झाला असून, नागरिकांच्या वर्दळीला होणारा अडथळाही कमी झाला आहे. केवळ टपऱ्या हटविण्यावर कारवाई थांबणार नसून सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करणाऱ्यांविरोधातही पोलिसांनी मोहीम सुरू ठेवली आहे. १ जानेवारीपासून आतापर्यंत अशा प्रकरणांत १७९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यापुढेही ज्या ठिकाणी उघड्यावर मद्यपान होत असल्याचे आढळेल, त्या ठिकाणी संबंधितांवर कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

पीएमटी चौकातील कारवाईनंतर भोसरी परिसरातील इतर ठिकाणांवरही पोलिसांकडून लक्ष ठेवले जाणार आहे. टपरी, हातगाडी किंवा अन्य ठिकाणी उघड्यावर मद्यपानासाठी जागा उपलब्ध करून दिली जात असल्याचे आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे.

त्यासाठी पोलिसांकडून परिसरनिहाय पाहणी करून अशा ठिकाणांची माहिती संकलित केली जाणार आहे.

सार्वजनिक ठिकाणी मद्यपानामुळे शिवीगाळ, वाद, मारामारी तसेच महिला आणि नागरिकांना त्रास होण्याचे प्रकार घडतात. त्यामुळे अशा ठिकाणांवर वेळीच कारवाई करून संभाव्य अनुचित प्रकारांना आळा घालण्यावर पोलिसांचा भर राहील.

सार्वजनिक ठिकाणी मद्यपान, अवैध धंदे आणि नागरिकांना त्रास देणाऱ्या घटकांविरोधात कारवाई सुरूच राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. परिसरात अशा प्रकारे उघड्यावर मद्यपान होत असल्यास किंवा टपरीचालकांकडून त्यासाठी जागा उपलब्ध करून दिली जात असल्यास त्याची माहिती नागरिकांनी तत्काळ द्यावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## प्रस्तावित कचरा प्रक्रिया केंद्राला मनसेचा तीव्र विरोध

■ पिंपरी (दै. संध्या)

निगडी प्रभाग क्रमांक १३ मधील राहुलनगर, सेक्टर क्रमांक २२ येथे पाण्याच्या टाकीजवळील उद्यानाच्या जागेत प्रस्तावित कचरा प्रक्रिया केंद्र उभारण्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने तीव्र विरोध दर्शविला आहे. या संदर्भात मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी महापौर आणि आयुक्त यांना निवेदन देऊन सदर प्रस्ताव चार दिवसांत रद्द करण्याची मागणी केली आहे.



मनसेचे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, प्रस्तावित जागा दाट लोकवस्तीमध्ये असून पाण्याच्या टाकीपासून अवघ्या ५० मीटर अंतरावर महापालिकेची शाळा आहे. या शाळेत शेकडो विद्यार्थी शिक्षण घेत असल्याने शाळेजवळ कचरा प्रक्रिया केंद्र उभारल्यास विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो.

कचरा प्रक्रिया केंद्रामुळे निर्माण होणारी दुर्गंधी, धूळ, डास-माशांचा प्रादुर्भाव, कचरा वाहतूक करणाऱ्या वाहनांची वर्दळ आणि प्रदूषण यामुळे परिसरातील नागरिक व विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागेल, असा दावा निवेदनात करण्यात आला आहे. तसेच पाण्याच्या टाकीजवळ प्रकल्प उभारल्यास पाणीपुरवठा दूषित होण्याचीही शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. उद्यानासाठी राखीव असलेल्या जागेत कचरा प्रक्रिया केंद्र उभारण्याचा प्रस्ताव तात्काळ रद्द करून ती जागा नागरिकांच्या सार्वजनिक वापरासाठी कायम ठेवावी, अशी मागणी मनसेने केली आहे. तसेच चार दिवसांत निर्णय न घेतल्यास विद्यार्थ्यांच्या आरोग्य आणि नागरिकांच्या हितासाठी तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

## कै. आदित्य पिसाळ यांच्या स्मरणार्थ भव्य रक्तदान स्पर्धा

■ पिंपरी(दै. संध्या)

कै. आदित्य नानासाहेब पिसाळ यांच्या स्मरणार्थ आपुलकी मित्र मंडळ, आकुर्डी यांच्या वतीने भव्य रक्तदान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक बांधिलकी जपत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, सामाजिक संस्था, युवक मंडळे तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन रमेश भोरकर आणि सुनील मोरे यांनी केले आहे. ही रक्तदान स्पर्धा रविवार, २० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत श्री विठ्ठल मंदिरासमोर, संत तुकाराम महाराज पालखी तळ, आकुर्डी येथे होणार आहे.

या स्पर्धेत सहभागी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ किंवा सामाजिक संस्थेच्या सर्वाधिक कार्यकर्त्यांनी रक्तदान केल्यास त्या मंडळाला रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. प्रथम क्रमांकासाठी २५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी १५ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी ७ हजार रुपये अशी पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. याशिवाय रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांमधून लकी ड्रॉ काढण्यात येणार असून, त्यामध्ये एक सायकल आणि एक ग्रॅम सोन्याचे नाणे अशी आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. "रक्तदान हेच खरे मानवतेचे दान" या सामाजिक संदेशातून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी इखलास सय्यद (मो. 9552345429) यांच्याशी संपर्क साधावा.

## चंद्रशेखर बावनकुळे यांची शत्रुघ्न काटे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

■ पिंपरी(दै. संध्या)

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पिंपरी-चिंचवड भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देत गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी गणपती बाप्पाची आरती करून गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. आमदार विक्रांत पाटील यांनीही उपस्थित राहून गणरायाचे भक्तिभावाने दर्शन घेत उत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या भेटीत काटे परिवाराने महसूल मंत्री बावनकुळे यांचे उत्साहात स्वागत केले. यावेळी कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांनी गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच शहरातील विकासकामे, भाजप पक्षसंघटना आणि विविध स्थानिक विषयांवरही चर्चा करण्यात आली. यावेळी बोलताना शत्रुघ्न (बापू) काटे म्हणाले, "महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे साहेबांचे आमच्या निवासस्थानी आगमन होणे आणि त्यांच्या हस्ते बाप्पाची महाआरती संपन्न होणे, हा आमच्या संपूर्ण काटे परिवारासाठी अत्यंत आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण आहे. व्यस्त दिनक्रमातून वेळ काढून त्यांनी दिलेली भेट आणि शहराच्या संघटनात्मक बाबींवर केलेले मार्गदर्शन आम्हा सर्व कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आहे." गणेशोत्सवाच्या पवित्र वातावरणात झालेल्या या भेटीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. सौहार्द, एकजूट आणि सामाजिक सलोखा यांचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमास भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बांधकाम परवानगी विभागातील भ्रष्टाचार व सर्व संशयास्पद फायलींची सखोल चौकशी करा

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागातील वाढत्या कथित भ्रष्टाचार, अनागोंदी कारभार आणि महसूल बुडवण्याच्या प्रकारांची स्वतंत्र त्रयस्थ यंत्रणेमार्फत सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी माजी विरोधी पक्षनेते तथा नगरसेवक विनोद नढे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे केली आहे. तसेच येत्या १५ दिवसांत ठोस कारवाई न झाल्यास महापालिका मुख्यालयासमोर तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही विनोद नढे यांनी प्रशासनाला दिला आहे. विनोद नढे यांनी दिलेल्या निवेदनात बांधकाम परवानगी विभागातील काही अधिकाऱ्यांवर प्रशमन शुल्क आकारणीत




कथित हेराफेरी केल्याप्रकरणी झालेल्या निलंबन कारवाईचे स्वागत केले आहे. मात्र, हा प्रकार केवळ हिमनगाचे एक टोक असून विभागात अनेक वर्षांपासून संगनमताने कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवण्याचे रॅकेट सक्रिय असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

निवेदनानुसार, शहरातील अनेक निवासी व व्यावसायिक प्रकल्पांना भोगवटा प्रमाणपत्र (OC) देताना, नकाशे मंजूर करताना तसेच एफएसआय (FSI) आणि विकास शुल्काची गणना करताना नियमबाह्य सवलती देण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. विकासकांच्या फायद्यासाठी महापालिकेच्या महसुलाचे नुकसान करून काही अधिकाऱ्यांनी स्वतःचा फायदा करून घेतल्याचा आरोपही करण्यात आला आहे. विनोद नढे यांनी नियमबाह्य एफएसआय मंजुरी, आरक्षणांचे उल्लंघन, बनावट कागदपत्रांच्या आधारे टीडीआर (TDR) लोडिंग, मंजूर नकाशांप्रमाणे बांधकाम नसतानाही दिलेली भोगवटा प्रमाणपत्रे, पार्किंग जागांचा अनधिकृत वापर आणि अग्निशमन नियमांचे उल्लंघन या सर्व बाबींची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच प्रकल्पांची प्रत्यक्ष स्थळपाहणी करून संबंधित कागदपत्रांची पडताळणी करण्यात यावी.

# गणेश मंडळाच्यासमोर डेंग्यू, चिकनगुनिया बाबत जनजागृती

■ पिंपरी (दै. संध्या)

मानवी हक्क संरक्षण आणि जागृती व पिंपरी चिंचवड महापालिका आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने नवी सांगवी, पिंपळे गुरव परीसरात डेंग्यू, चिकनगुनिया आजाराबाबत संध्याकाळी सात ते नऊ वेळात दररोज पाच मंडळामध्ये स्पीकरद्वारे, माहितीपत्रक वाटून डेंग्यू, चिकनगुनिया आजाराची जनजागृती करण्यात आली. डेंग्यू आजार होऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी आणि झाल्यावर त्यावरील उपाय योजनांची माहिती स्वतः शहराध्यक्ष अण्णा जोगदंड हे स्पीकरमधून गणेश भक्तांना देत आहेत, ही जनजागृती अनंत चतुर्थीपर्यंत चालणार असल्याचे जोगदंड यांनी सांगितले.




आरोग्य निरीक्षक स्नेहल सोनवणे म्हणाल्या कि, डेंग्यू आजार म्हणजे डंक छोटा, धोका मोठा, त्यामुळे हिवताप, डोकेदुखी, अंगावर लालसर रंग येणे, तीव्र पाठ दुखी, पुरळ उठणे असे लक्षणे दिसून आल्यास डॉक्टरांचा सल्ला घेण्याचे त्यांनी आव्हान केले. प्लास्टिक न वापरण्याची व पर्यावरण रक्षणाची गणेश भक्तांना जोगदंड यांनी यावेळी शपथ दिली.

सांगवी-पिंपळे गुरव परिसरातील महाराष्ट्र मित्र मंडळ, समतानगर मित्र मंडळ, सत्ता प्रतिष्टान, शिव प्रतिष्ठान, शिवराय मित्र मंडळ याठिकाणी जनजागृती घेण्यात आली. यावेळी जनजागृती मोहीमेत शहराध्यक्ष अण्णा जोगदंड, आरोग्य निरीक्षक स्नेहल सोनवणे, नगरसेविका दीप्ती कांबळे, बेसिक टीमचे पवन रंधे, महाराष्ट्र मित्र मंडळाचे अध्यक्ष मनीष भापकर, मानवी हक्क संरक्षण आणि जागृतीच्या पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्षा संगीता जोगदंड, कार्याध्यक्ष मुरलीधर दळवी, समतानगर मित्र मंडळ उत्सव समिती धीरज बारणे, पदाधिकारी उपस्थित होते.

# गणपती मंडळांकडून जिवंत देखावे



## “भवानी पेठेत साकारली अब्दुल हमीद यांची शौर्यगाथा - रणगाडा आणि बॉम्ब ब्लास्ट ठरतंय आकर्षण”



श्री शिवाजी मित्र मंडळ, भवानी पेठ यांनी यंदाच्या वर्षी १९६५ च्या भारत-पाक युद्धावर आधारित देशभक्तीपर आणि नेत्रदीपक सजीव देखावा सादर केला आहे - " परमवीर चक्र विजेते अब्दुल हमीद की शौर्य गाथा " या देखाव्यात एकूण दहा कलाकार असून मंडपातून धावणारा मोठा रणगाडा, अब्दुल हमीद चा झिप प्रवेश आणि बॉम्ब ब्लास्टचे थरारक सादरीकरण हे प्रमुख आकर्षण ठरले आहे. असल उत्तरच्या लढाईतील रोमांचकारी प्रसंग यात जिवंत करण्यात आला असून प्रेक्षक देशभक्तीने भारावून जात आहेत. हा जिवंत देखावा पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी झालेली दिसून आली. (Photo : Sushil Rathod)

## माहेरी आलेल्या जेष्ठ गौराईची सुंदर आकर्षक सजावट व विविध नैवेध अर्पण



गणपती बाप्पा आणि गौराईचे मोठ्या उत्साहात आज पूजन करण्यात आले. जेष्ठ गौरीचे आगमन आणि ज्येष्ठा गौरीचा पूजन सोहळा आज संपन्न झाले. जगातील जगप्रसिद्ध असलेल्या भगवान बालाजी महाराजांच्या एका मंदिराची प्रतिकृती साकारण्यात आली. या मंदिराच्या माध्यमातून दक्षिणात्य पद्धतीच्या मंदिराची मांडणी बालाजी महाराजांचे चित्र त्याचप्रमाणे बालाजी महाराजांच्या असलेल्या पत्नी पद्मावती देवी व महालक्ष्मी तसेच श्री गणरायाच्या पत्नी वृद्धी आणि सिद्धी यांचे देखील या सजावटीतुन दर्शन होत आहे. जेष्ठ गौरीचे " कोषा पौढाई " (साडी ) दक्षिणेतील महिलांचा आकर्षक पेहराव करून दागदागिन्यांची सजावट द्वारे सजविण्यात आले. माहेरी आलेल्या या गौराईंना नैवैध रुपी गोड गोड पदार्थ, फराळाचे ताट अनेक प्रकारचे फळे अर्पण करण्यात आले. रविवार पेठेतील सामान्य घरातील रहिवासी सौ.कविता ढवळे द्वारे आपल्या छोट्या घरात मोठ्या उत्साहाने व प्रेमाने या देखाव्याची सजावट केली.

## “अरण्येश्वरमध्ये लोककलेतून “व्यसन आख्यान” - ड्रग्सविरोधात जनजागृती”



तरुणाईला ड्रग्स आणि अमली पदार्थांच्या विळख्यातून वाचवण्यासाठी एकता मित्र मंडळ,अरण्येश्वर यांच्या द्वारे यंदा " संगीतमय व्यसन आख्यान " हा आगळा-वेगळा प्रबोधनपर देखावा सादर करण्यात आला. ड्रग्सने आपली तरुणाई पोखरली जात आहे या गंभीर विषयावर लोककलेच्या माध्यमातून हा देखावा साकारला आहे. गण, नमन, वासुदेव, भारूड, शाहीर, पोतराज, गोंधळ या पारंपारिक लोककलां द्वारे सादर करून व्यसनांचे दुष्परिणाम मांडण्यात आले आहेत. (Photo : Sushil Rathod)



वडगाव शेरी येथील राजेश दावनपेल्ली यांच्या घरी श्रींची प्राणप्रतिष्ठापना व तिरुपती बालाजी मंदिराची सुरेख देखावा सादर

## जनजागृती मित्र मंडळाचा डोळ्यात अंजन घालणारा देखावा : “श्रद्धा डोळस हवी”



भोंदू बाबांच्या पासून दूर राहण्याचा सल्ला दिला व विवेकाने दीप पेटवत संतांच्या विचारावर चालण्याचा संदेश या मनोरंजन पर देखावा सादर करण्यात आला. अंधश्रद्धेच्या विळख्यात अडकलेल्या समाजाला जागे करण्याचा प्रयत्न या देखाव्यातून करण्यात आला असून नागरिकांनी या देखाव्याला मोठी गर्दी केली आहे. एकूण आठ कलाकारांनी हा देखावा सादर केला.

## चक्रवर्ती अशोक मंडळ ट्रस्ट इलेक्ट्रिक अँड इलेक्ट्रॉनिक मार्केट बुधवार पेठ





मंडळाचा गौरवशाली ७८ वर्षात दमदार पदार्पण करून भव्य जिवंत देखावा सादर करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या न्यायप्रियतेचा आणि रयतेप्रति असलेल्या त्यांच्या संवेदनशीलतेचा इतिहास सांगणारा हा जिवंत देखावा म्हणजे रयतेच्या लेकीसाठी छत्रपती शासन गुन्हेगाराचा चौरंग.




रविवार पेठ लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिर जवळील वीर हनुमान मित्र मंडळ तर्फे फूड माफियांचे कर्दनकाळ आणि महाराष्ट्राचे खरे सिंघम .... दबंग अधिकारी श्री तुकाराम मुंढे यांच्या द्वारे अनेक ठिकाणी करण्यात आलेल्या कडक कारवाईचे सादरीकरण करण्यात आले आहे. " नियम हे मोडण्यासाठी नसतात तर, ते समाजाच्या कल्याणासाठी शिस्त आणि सुव्यवस्थेसाठी असतात ..... " " मला श्री च्या नैवद्यात अजिबात भेसळ चालणार नाही " अश्या अनेक पोस्टर या देखाव्यात मंढण्यात आले आहे.



भारताचे कर्तव्यदक्ष " पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी " यांच्या वाढदिवसा निमित्त लोककल्याण प्रतिष्ठान पूण तर्फे १५ x १५ फुटी भव्य रांगोळी साकारण्यात आली. नागरिक मोठ्या संख्येने रांगोळीत अवतरलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाहण्यासाठी गर्दी केलेली दिसून आली. रांगोळीकार संदीप ढवळे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या तर्फे भव्य रांगोळी साकारण्यात आली.

## थोडक्यात पण महत्वाचे



### प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते अभिवादन

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीत थोर समाजसुधारक, विचारवंत, लेखक आणि पत्रकार केशव सीताराम उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, शिक्षण समिती सभापती रविना अंघोळकर आणि महिला व बालकल्याण समिती सभापती राणीमाई पठारे,उप आयक्त अण्णा बोदडे,लेखाधिकारी दिपक गायकवाड,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,सामाजिक कार्यकर्ते मधूकर बच्चे यांच्यासह महानगरपालिकेचे विविध विभागातील कर्मचारी उपस्थित होते. प्रबोधनकार ठाकरे यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून समाजातील अनिष्ट रूढी, अंधश्रद्धा, जातीय विषमता आणि सामाजिक अन्यायाविरोधात प्रखर भूमिका मांडली. समाजात विवेक, समता, स्वाभिमान आणि परिवर्तनाची जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांनी आपले आयुष्य समर्पित केले. त्यांच्या निर्भीड विचारांनी आणि परखड लिखाणाने समाजप्रबोधनाला नवी दिशा मिळाली.

### RTE विद्यार्थ्यांकडून 'ॲक्टिव्हिटी'च्या नावाखाली पैसे उकळल्याचा आरोप

**पिंपरी : दैनिक संध्या**

इंदिरा गांधी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये 'ॲक्टिव्हिटी'च्या नावाखाली विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारले जात असल्याचा आरोप पालकांकडून करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, RTE अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडूनही विविध कारणे सांगून पैसे घेतले जात असल्याचा आरोप करण्यात आल्याने या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. पालकांच्या म्हणण्यानुसार, 'ॲक्टिव्हिटी'च्या नावाखाली विद्यार्थ्यांकडून पैसे घेतले जात आहेत. पैसे भरले नाहीत तर विद्यार्थ्यांचे पेपर तपासून दिले जाणार नाहीत, तसेच विद्यार्थ्यांना परीक्षेला बसू दिले जाणार नाही, अशा प्रकारची धमकी दिली जात असल्याचा आरोप काही पालकांनी केला आहे. या प्रकारामुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, अनेक पालक आपल्या मुलांच्या भवितव्याचा विचार करून उघडपणे तक्रार करण्यास पुढे येत नसल्याचे सांगण्यात येत आहे. 'तक्रार केली तर तुमच्या मुलांना शाळेतून काढून टाकले जाईल', अशी भीती पालकांच्या मनात निर्माण झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. RTE अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शासनाकडून तरतूद असताना, त्यांच्या पालकांकडून विविध कारणांच्या नावाखाली अतिरिक्त शुल्क आकारले जात असेल, तर हा गंभीर विषय असल्याचे पालकांचे म्हणणे आहे. संबंधित शुल्क कोणत्या नियमाअंतर्गत आकारले जाते, त्यासाठी प्रशासनाची परवानगी आहे का आणि विद्यार्थ्यांकडून घेतलेल्या रकमेचा वापर कशासाठी केला जातो, याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, सचिन काळभोर यांनी या प्रकरणाची दखल घेत पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त तसेच शिक्षण मंडळाकडे तक्रार करून संबंधित शाळेविरोधात चौकशी करून दोषी आढळल्यास कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. RTE विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारे अतिरिक्त शुल्क आकारले जात असल्यास त्याची तातडीने चौकशी करावी आणि विद्यार्थ्यांना अथवा त्यांच्या पालकांना धमकावले जात असल्याच्या आरोपांचीही सत्यता तपासावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा अधिकार अबाधित राहणे गरजेचे असून, शुल्काच्या कारणावरून विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यापासून रोखणे किंवा त्यांच्यावर कोणताही दबाव आणणे योग्य आहे का, याची प्रशासनाने स्पष्टता करावी, अशी मागणी पालकांकडून होत आहे. या संपूर्ण प्रकरणाची महापालिका प्रशासन आणि शिक्षण मंडळाकडून चौकशी होऊन वस्तुस्थिती समोर येणार का आणि संबंधित शाळेविरोधात कोणती कारवाई केली जाणार, याकडे पालकांचे लक्ष लागले आहे.

### पावसाने ओढ दिल्याने बळीराजा चिंतेत खरीप पिकांवर संकटाचे सावट

**कोरेगावमुळ : दैनिक संध्या**

यंदाच्या पावसाळ्यात अपेक्षित प्रमाणात पाऊस न झाल्याने शेतकरी वर्ग चिंतेत सापडला आहे. पावसाळ्याचा कालावधी पुढे सरकत असतानाही दमदार पावसाची प्रतीक्षा कायम असल्याने शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे लागले आहेत. पावसाच्या अनिश्चिततेचा थेट परिणाम खरीप हंगामातील पिकांवर होत आहे. सुरुवातीला झालेल्या पावसानंतर शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने पेरणी केली मात्र त्यानंतर पावसाने अनेक दिवस दडी मारल्याने पिकांना आवश्यक ओलावा मिळत नाही. काही भागात पिकांची वाढ खुंटण्याची परिस्थिती निर्माण झाली असून, उत्पादनावर परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. शेतीसाठी बियाणे, खते, औषधे आणि मशागतीवर मोठा खर्च करून शेतकऱ्यांनी खरीप हंगामाची तयारी केली आहे. मात्र पावसाची साथ मिळत नसल्याने केलेला खर्च आणि उत्पादन याचा ताळमेळ कसा साधायचा, असा प्रश्न बळीराजासमोर उभा राहिला आहे. 'आभाळाकडे पाहायचे आणि पावसाची वाट पाहायची' अशी अवस्था शेतकऱ्यांची झाली असून, आता तरी वरुणराजाने दमदार हजेरी लावून पिकांना जीवदान द्यावे, अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

### शिवनेरी ॲग्रीकल्चर डीलर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी अजित वाजगे

**नारायणगाव : दैनिक संध्या**

शिवनेरी ॲग्रीकल्चर डीलर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी अजित वाजगे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. असोसिएशनच्या नुकत्याच झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत आगामी वर्षासाठी नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यावेळी विविध पदांवर पदाधिकाऱ्यांची निवड उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. नवीन कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी अजित घुले, सचिवपदी राजू वामन, तर खजिनदारपदी मयूर घुले यांची निवड करण्यात आली. कायदेविषयक सल्लागार म्हणून ॲड. रमेश बाविस्कर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष रवींद्र माळी यांची पुणे जिल्हा समितीवर निवड झाल्याने त्यांचेही अभिनंदन करण्यात आले. शिवनेरी ॲग्रीकल्चर डीलर्स असोसिएशनच्या माध्यमातून परिसरातील शेतकऱ्यांना शेतीविषयक योग्य मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याबरोबरच आधुनिक कृषी तंत्रज्ञान, पिकांवरील रोगांचे नियंत्रण आणि पीक व्यवस्थापन याबाबत विविध उपक्रम राबविले जातात.

# कौशल्य विकास व जागतिक रोजगार संधींसाठी टिएसपीएलचा महत्त्वपूर्ण टप्पा

■ चाकण (दै. संध्या)



चाकण येथील टॅलेंटकॉर्प सोल्यूशन्स प्रा. लि.ने युवकांना जागतिक स्तरावरील करिअर संधी उपलब्ध करून देण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. मलेशियातील एका प्रतिष्ठित विद्यापीठासोबत कौशल्य विकास आणि जागतिक रोजगार संधी यांसाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या कराराच्या स्वाक्षरी समारंभात टिएसपीएलचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. मेहबूब सैय्यद यांना विशेष अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. या भागीदारीमुळे विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख शिक्षण, प्रत्यक्ष प्रशिक्षण, इंटर्नशिप तसेच आंतरराष्ट्रीय करिअरच्या संधी उपलब्ध होणार आहेत. आजच्या स्पर्धात्मक युगात उद्योगांच्या गरजा आणि शैक्षणिक अभ्यासक्रम यांच्यातील दरी कमी करणे आवश्यक झाले आहे. या कराराद्वारे विद्यार्थ्यांना उद्योगस्नेही कौशल्ये विकसित करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. उद्योगांच्या गरजेनुसार कौशल्य विकास कार्यक्रम राबविणे. विद्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीय रोजगाराच्या संधी निर्माण करणे. इंटर्नशिप, अप्रेंटिसशिप आणि उद्योग अनुभव उपलब्ध करून देणे. करिअर मार्गदर्शन, कार्यशाळा आणि प्लेसमेंट उपक्रम आयोजित करणे. जागतिक स्तरावर मान्यता प्राप्त व्यावसायिक कौशल्यांचा विकास करणे. उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधील सहकार्य अधिक बळकट करणे अपेक्षित आहे. जागतिकीकरणामुळे विविध देशांमध्ये कुशल मनुष्यबळाची मागणी वाढत आहे. या पार्श्वभूमीवर टिएसपीएल आणि संबंधित विद्यापीठ यांच्यातील ही भागीदारी विद्यार्थ्यांना जागतिक रोजगार बाजारपेठेत प्रवेश मिळवून देण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये करिअर घडविण्याची संधी मिळणार असून त्यांचे कौशल्य आणि रोजगार क्षमता वाढण्यास मदत होणार आहे. हा सामंजस्य करार केवळ एक औपचारिक करार नसून शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगार यांना एकत्र जोडण्याच्या सामायिक ध्येयाचे प्रतीक आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक कौशल्ये आणि जागतिक करिअरच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी दोन्ही संस्था एकत्रितपणे कार्य करणार आहेत.

## वडज घाटात वृक्षलागवडीतून पर्यावरण संवर्धन

■ नारायणगाव (दै. संध्या)



तीर्थक्षेत्र वडज येथील प्रसिद्ध बैलगाडा घाट परिसरात पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने एक अत्यंत स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आला आहे. शिवमल्हार फाउंडेशन आणि स्थानिक ग्रामस्थांच्या संयुक्त पुढाकारातून या परिसरात एका भव्य 'ऑक्सिजन पार्क'ची उभारणी केली जात आहे. या पर्यावरणपूरक मोहिमेचा शुभारंभ म्हणून वडज घाट परिसरात नुकतीच १०० वटवृक्षांची लागवड करण्यात आली.

जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संतोष चव्हाण यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली हा संपूर्ण उपक्रम अत्यंत यशस्वीपणे राबवला जात आहे. या वृक्षारोपण मोहिमेमुळे आगामी काळात हा संपूर्ण परिसर हिरवागार आणि निसर्गरम्य होण्यास मोठी मदत होणार आहे.

केवळ झाडे लावण्यापुरता हा उपक्रम मर्यादित नसून, लावलेल्या रोपांचे पुढील संगोपन करण्यासाठी विशेष काळजी घेतली जाणार आहे. ग्रामस्थांनी श्रमदानातून आणि लोकसहभागातून या लावलेल्या वृक्षांना सुरक्षित ठेवण्यासाठी संरक्षण जाळ्या बसवण्याचे काम सुरू केले आहे. तसेच, कडक उन्हाळ्यात किंवा पाण्याच्या कमतरतेमुळे झाडे सुकू नयेत, यासाठी योग्य सिंचन व्यवस्था देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे.

आगामी काळात शिवमल्हार फाउंडेशन आणि ग्रामस्थांच्या माध्यमातून या परिसरात आणखी शेकडो विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्याचा ठाम निर्धार करण्यात आला असल्याची माहिती तुषार साळुंके यांनी दिली.वडज घाटाचे सौंदर्य वाढवण्यासोबतच या भागातील शुद्ध हवेचे प्रमाण वाढवण्यासाठी हा उपक्रम एक महत्त्वाचा टप्पा ठरेल.

## जग्सोमने २०२७-२९ च्या बॅचसाठी प्रवेश प्रक्रिया केली सुरू

■ मुंबई (दै. संध्या)

जगदीश शेठ स्कूल ऑफ मॅनेजमेंटने त्यांच्या पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मॅनेजमेंट आणि मास्टर इन बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन या अभ्यासक्रमांच्या २०२७-२९ च्या बॅचसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू केली आहे. संस्थेने पात्र उमेदवारांसाठी एकूण ५ कोटी रुपयांची शिष्यवृत्ती उपलब्ध करून दिली आहे. या प्रवेश प्रक्रियेअंतर्गत, गुणवंत उमेदवारांना पडोदे फाऊंडेशन शिष्यवृत्तीद्वारे ७.५ लाख रुपयांपर्यंतची शिष्यवृत्ती प्रदान केली जाईल.

निवड ही शैक्षणिक सातत्य, नेतृत्व क्षमता, शिकण्याची आवड आणि शिष्यवृत्ती मूल्यांकनातील कामगिरी यावर आधारित असेल. जग्सोमच्या संचालिका डॉ. श्रीदेवी वाराणसी म्हणाल्या की, गेल्या वर्षी संस्थेकडे आलेल्या अर्जांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून, प्रवेशांमध्ये वार्षिक सुमारे ४० टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यांनी पुढे सांगितले की, संस्थेसाठी प्रतिभा केवळ स्पर्धा परीक्षेतील गुणांपुरती मर्यादित नाही. त्यामुळे, विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या आणि नेतृत्व क्षमतेच्या दृष्टीने त्यांच्या शैक्षणिक सातत्याचेही मूल्यांकन केले जाते. जग्सोम(JAGSoM) मधील व्यवस्थापन शिक्षण हे वर्ग-आधारित शिक्षणासोबतच उद्योगाच्या गरजांनुसार तयार केलेल्या व्यावहारिक प्रशिक्षणावर भर देते. संस्थेच्या कार्यक्रमांमध्ये सोशल इमर्शन प्रोग्राम, पर्सनॅलिटी एन्हांसमेंट प्रोग्राम, रिसर्च अँड इनोव्हेशन इन्क्युबेशन आणि इंडस्ट्री इंटर्नशिप प्रोग्राम यांचा समावेश आहे. संस्थेने २०२६-२८ च्या प्रवेश सत्रासाठी पाडोदे फाउंडेशन शिष्यवृत्ती सुरू केली असून, त्याअंतर्गत ११ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान केली जात आहे. जग्सोम(JAGSoM) हे PGDM आणि MBA च्या प्रवेशासाठी CAT, XAT, CMAT, GMAT आणि MAT चे गुण स्वीकारते.

## 'वसुधैव कुटुंबकम्' हाच आंतरराष्ट्रीय लोकशाही मूल्यांचा पाया

■ नाशिक (दै. संध्या)

जगभर साजऱ्या होणाऱ्या आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनानिमित्त यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या यशवाणी वेब रेडिओवर 'आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन परिचय' या विषयावर ज्ञानसत्राचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनातर्फे आयोजित हे २४ वे ज्ञानसत्र दि. १७ सप्टेंबर २०२६ रोजी संपन्न झाले. परिसंवादातील तज्ज्ञांनी 'वसुधैव कुटुंबकम्' ही संकल्पना आंतरराष्ट्रीय लोकशाही मूल्यांचा महत्त्वपूर्ण पाया असल्याचे प्रतिपादन केले. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या संकल्पनेतून आणि प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या कल्पक मार्गदर्शक सूचनेनुसार या ज्ञानसत्राचे आयोजन करण्यात आले. महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाचे प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी ज्ञानसत्राचे समन्वयन, सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले.

परिसंवादात लोकशाहीची जागतिक संकल्पना, दक्षिण आशियातील लोकशाहीची वाटचाल, विविधता, नागरिकांचा सहभाग, विरोधी पक्षांची भूमिका तसेच लोकशाहीसमोरील समकालीन आव्हाने यांवर चर्चा करण्यात आली. लोकशाही ही केवळ निवडणूक प्रक्रिया नसून समानता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, संवाद, सहअस्तित्व आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागावर आधारित व्यापक व्यवस्था असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. प्रथम परिसंवादक डॉ. राजेंद्र बगाटे यांनी 'लोकशाहीची दक्षिण आशियाई जडणघडण : सार्क देशांची वाटचाल, विविधता आणि आव्हाने तसेच विरोधी पक्षांची भूमिका' या विषयावर विचार मांडले.

## समर्थच्या खेळाडूंची बॉक्सिंग, बुद्धिबळ व कराटे स्पर्धेत दमदार कामगिरी

■ जुन्नर (दै. संध्या)




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे अंतर्गत आयोजित बॉक्सिंग स्पर्धेत समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बेल्हे येथील खेळाडू आदित्य सूर्यवंशी याने उत्कृष्ट कामगिरी करत अंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड मिळवली. तसेच जुन्नर येथे झालेल्या तालुकास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेत समर्थ गुरुकुलची विद्यार्थिनी अवनी औटी हिने १९ वर्षांखालील मुलींच्या गटात तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. जुन्नर तालुकास्तरीय कराटे स्पर्धा २०२६ मध्ये समर्थ गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी विविध वयोगट व वजन गटांत उल्लेखनीय कामगिरी करत एकूण १३ प्रथम क्रमांक व १ द्वितीय क्रमांक मिळवला. या सर्व विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.

कराटे स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलांच्या गटात वीरेंद्र गाजरे याने २५ ते ३० किलो वजन गटात द्वितीय क्रमांक मिळवला. १७ वर्षांखालील मुलांच्या गटात अवधूत भांबरे (३०-३५ किलो), सोहम नितीन शेलार (४०-४५ किलो), कार्तिक गुंडे (४५-५० किलो) आणि संस्कार डुकरे (६०-६५ किलो) यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

१७ वर्षांखालील मुलींच्या गटात गौरी चौधरी (३०-३५ किलो), श्रावणी चौधरी (३५-४० किलो) आणि रुद्र आहेर (४५-५० किलो) यांनी प्रथम क्रमांक मिळवला. १९ वर्षांखालील मुलांच्या गटात सिद्धेश विश्वासराव (६०-६५ किलो), विघ्नेश पवार (८२ किलो) आणि जीवन बांगर (८२ किलोपेक्षा अधिक) यांनी सुवर्ण कामगिरी केली.

१९ वर्षांखालील मुलींच्या गटात समृद्धी जाधव (६५ किलोपेक्षा अधिक), प्रचिती इंगळे (४६-४८ किलो), इशिता काकडे (४२-४४ किलो) आणि दीक्षा भोर (५५-६० किलो) यांनी प्रथम क्रमांक मिळवला. बॉक्सिंगमध्ये आदित्य सूर्यवंशी याने जिद्द, आत्मविश्वास आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर जिल्हास्तरावर प्रभावी कामगिरी केली. बुद्धिबळात अवनी औटी हिने एकाग्रता, संयम, अचूक निर्णयक्षमता आणि डावपेचात्मक कौशल्याच्या जोरावर तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला.

# व्यक्तिमत्व विकासासाठी संवाद कौशल्य वाढवावे : डॉ. गोविंद कुलकर्णी

■ पिंपरी (दै. संध्या)




महाविद्यालयीन काळात विद्यार्थ्यांनी शैक्षणिक अभ्यासक्रम बरोबरच शिस्त आणि सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून व्यक्तिमत्व विकासासाठी संवाद कौशल्य वाढवा, स्व. निर्णयक्षमता विकसित झाली की आत्मविश्वास देखील वाढतो. महाविद्यालयाच्या वतीने उपलब्ध केलेल्या विविध संधींचा सदुपयोग करावा आणि आपले करिअर घडवावे असे मार्गदर्शन पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी केले .

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील प्रथम वर्ष बी. टेक २०२६-२७ च्या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभात यावेळी पीसीसीओईचे उपसंचालक डॉ. निळकंठ चोपडे, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल अधिष्ठाता डॉ. शितलकुमार रवंदळे, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. के. राजेश्वरी, डीन डॉ. पी. ए. देशमुख, डॉ. रजनी पी. के., डॉ. एस. व्ही. शिंदे, डॉ. एस. एस. सोनार, डॉ. नरेंद्र देवरे, डॉ. महेश कोलते, डॉ. वर्षा हरपाळे, डॉ. एस. यू. भंडारी, डॉ. रोशनी राऊत, विभाग प्रमुख डॉ. सोनाली पाटील, डॉ. एस. एस. सांबरे, डॉ. ए. डी. ठाकरे, डॉ. अश्विनी वझे, डॉ. जे. व्ही. कट्टी, डॉ. ए. के. गायकवाड, डॉ. एस. बी. माटेकर, डॉ. पी. आर. काळे, शैक्षणिक व सामाजिक शास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. लीना शर्मा, विद्यार्थी व पालक आदी उपस्थित होते. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल अधिष्ठाता डॉ. शितलकुमार रवंदळे यांनी सांगितले की, जगभर सर्वत्र एआय ची चर्चा आहे. यामुळे गुंतवणूक आणि रोजगार संधी वाटणार आहे. परंतु यासाठी प्रथम आपण उच्च दर्जाचे तांत्रिक कौशल्य प्राप्त करून स्वतःला सक्षम केले पाहिजे. याची जबाबदारी पीसीईटी अंतर्गत असणाऱ्या पीसीसीओई महाविद्यालय सह इतर महाविद्यालय देखील परिपूर्ण आहेत.

मात्र विद्यार्थ्यांनी देखील स्वतःचे योगदान देणे तितकेच आवश्यक आहे. डॉ. संदीप पाटील, डॉ. अश्विनी वझे यांनी देखील विद्यार्थी व पालकांना विद्यार्थी सक्षमीकरण, वैयक्तिक विकास, शैक्षणिक उत्कृष्टता आणि जबाबदार नागरिकत्व या विषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांना स्वतःवर विश्वास ठेवण्यास, स्वतःच्या विकासाची जबाबदारी घेण्यास आणि उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करण्यास प्रोत्साहित केले. समारोप सत्रात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांसोबत संवाद साधत पालक सभा घेण्यात आली.

## थोडक्यात पण महत्वाचे



### पुरंदर तालुक्यातील दौंडज येथे वीरच्या म्हस्कोबा मंदिराची उभारली प्रतिकृती

**जेजुरी : दैनिक संध्या**

सर्वत्र गणेश उत्सवाची धामधूम सुरू असून सार्वजनिक मंडळाबरोबरच घरी बसविलेल्या गणपती समोर सजावट करण्याची क्रेझ वाढली आहे. पुरंदर तालुक्यातील दौंडज येथील कदम वस्तीवर आशुतोष कदम या तरुणाने थर्माकोलचा वापर करून वीर येथील प्रसिद्ध असणाऱ्या म्हस्कोबा मंदिराची आकर्षक प्रतिकृती साकारली आहे. हा देखावा पाहण्यासाठी नागरिक गर्दी करीत आहेत.

### जेजुरी पोलिस स्टेशन हद्दीत 258 सार्वजनिक मंडळांनी केली श्री गणेशाची प्रतिष्ठापना

**जेजुरी : दैनिक संध्या**

जेजुरी पोलिस स्टेशन हद्दीतील विविध गावातील 258 सार्वजनिक मंडळांनी केली श्री गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली.तर जेजुरी शहरात ४४ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी केली प्रतिष्ठापना केली आहे.ग्रामीण भागातील पाच गावांत एक गाव एक गणपती ही संकल्पना राबविण्यात आली आहे. दिनांक 14 रोजी खूप थाटामाटात आणि धार्मिक वातावरणात जेजुरी व परिसरात गणरायाचे आगमन झाले.भाविकांच्यात मोठा उत्साह पाहण्यास मिळाला. जेजुरी पोलिस स्टेशन हद्दीतील तक्रारवाडी, टेकवडी, सुकलवाडी, आंबळे, पिसे आदी गावांमध्ये एक गाव एक गणपती ही संकल्पना राबविण्यात आली आहे. दरम्यान, पोलीस प्रशासन विशेषतः जेजुरी पोलीस ठाण्याच्या वतीने गणेशोत्सव साजरा करताना, अंमली पदार्थ विरोधी व पर्यावरण संवर्धन, महिला व बाल सुरक्षा, सायबर सुरक्षा व नागरिक दक्षता, मंडप, ध्वनी व लेझर बंदी बाबत आचारसंहितेची मार्गदर्शक मूलतत्त्वे, आणि जनजागृती माहिती पत्रकांचे वितरण करण्यात येत असून गणेशोत्सव मंडळांनी धार्मिक व मंगलमय वातावरणात शांततेत, सुरक्षित व शिस्तीत उत्सव साजरा करावा असे आवाहन करण्यात आल्याची माहिती पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील, सहा.पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर उदार यांनी दिली. पोलीस प्रशासनाने घालून दिलेली आचार संहिता, व मार्गदर्शक मूलतत्त्वे यांचे पालन करीत धार्मिक, मंगलमय वातावरणात तसेच शांतता, शिस्तीमध्ये समाजभिमुख उपक्रम राबविणाऱ्या आणि डीजे डॉल्बीला फाटा देत पारंपरिक वाद्यांमध्ये मिरवणूक काढणाऱ्या गणेश मंडळांना दादा फाऊंडेशनच्या वतीने नगराध्यक्ष जयदीप बारभाई, जेजुरी पोलीस ठाण्याचे निरीक्षक रवींद्र पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिंह गौर यांचे हस्ते आदर्श मंडळ पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे तसेच एक गाव एक गणपती संकल्पना राबविणाऱ्या मंडळांचा सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती फाउंडेशनचे कार्यवाह शिवराज झगडे, नगरसेवक रमेश लेंडे, माजी नगराध्यक्ष रोहिदास कुंभार यांनी दिली.

### वेधशाळा भेटीतून विद्यार्थ्यांना विज्ञानाची अनुभूती

**नारायणगाव: दैनिक संध्या**

कुरण येथील जयहिंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकॉम्युनिकेशन इंजिनिअरिंग आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी एका विशेष शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी प्रसिद्ध खगोलशास्त्रीय वेधशाळेला भेट देऊन विज्ञानाचे थेट प्रात्यक्षिक अनुभवले. या अभ्यास दौऱ्या दरम्यान विद्यार्थ्यांना वेधशाळेतील विविध अत्याधुनिक सुविधा, यंत्रसामग्री आणि खगोलशास्त्रात वापरल्या जाणाऱ्या प्रगत तंत्रज्ञानाची सविस्तर माहिती मिळाली. वेधशाळेचे वैज्ञानिक सहाय्यक निलेश पोखरकर यांनी विद्यार्थ्यांना दोन मीटर ऑप्टिकल टेलिस्कोपची कार्यपद्धती समजावून सांगत सखोल मार्गदर्शन केले. यामुळे विद्यार्थ्यांना वैज्ञानिक संकल्पना प्रत्यक्ष अनुभवातून समजून घेता आल्या. आधुनिक वैज्ञानिक उपकरणांची कार्यपद्धती जवळून पाहिल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण होण्यास मदत झाली. या शैक्षणिक भेटीमुळे विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक ज्ञानात मोलाची भर पडली असून, विज्ञान व तंत्रज्ञानाचा मानवी जीवनातील उपयोग आणि त्याचे महत्त्व अधिक दृढ झाले आहे. ही शैक्षणिक भेट यशस्वी करण्यासाठी जयहिंद शैक्षणिक संकुलाच्या संचालिका डॉ. एस. डी. गुंजाळ, प्राचार्य डॉ. ए. बी. उबाळे,मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. डी. एस. गल्हे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच प्रा.डॉ. व्ही. एम. धेडे व प्रा. एस. ई. शिंदे यांचे विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन लाभले. या संपूर्ण उपक्रमाचे नेटके संयोजन औद्योगिक भेटीचे समन्वयक प्रा. एस. डी. चौगुले व प्रा. एस. एस. लोहोटे यांनी केले होते. तसेच कॉलेजचे सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी ही भेट यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

### पाण्याच्या वादातून नातेवाईकावर जीवघेणा हल्ला; दोघांना एक वर्षाचा कारावास

**जुन्नर : दैनिक संध्या**

सामाईक विहिरीचे पाणी व पाईपलाईनवरून झालेल्या वादातून नातेवाईकाला लाकडी दांडक्याने मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी जुन्नर प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने दोघांना दोषी ठरवत एक वर्षाच्या साध्या कारावासाची व दंडाची शिक्षा सुनावली. न्यायदंडाधिकारी नम्रता महादेव बिरादार यांनी १६ सप्टेंबर रोजी हा निकाल दिला. बबन लक्ष्मण पिंगट (वय ६७) व देविदास बबन पिंगट (वय ४१, दोघे रा. बेल्हे, ता. जुन्नर) अशी शिक्षा झालेल्या आरोपींची नावे आहेत. बेल्हे येथील गट क्रमांक २११ मधील सामाईक विहिरीच्या पाण्यावरून हा वाद झाला होता. २३ फेब्रुवारी २०१९ रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास फिर्यादी हरिदास नागू पिंगट यांच्या पाण्याची पाळी असताना आरोपींनी पाणी सुरू ठेवल्याने वाद झाला. फिर्यादी यांच्या पत्नीने हरकत घेतल्यानंतर आरोपींनी शिवीगाळ केल्याचा आरोप होता. वाद सोडविण्यासाठी गेलेल्या हरिदास पिंगट यांना आरोपी बबन पिंगट यांनी गळा पकडून जमिनीवर पाडले, तर देविदास पिंगट याने लोखंडी खोऱ्याच्या लाकडी दांडक्याने त्यांच्या पाठीवर व पायावर मारहाण केली. या हल्ल्यात फिर्यादी गंभीर जखमी होऊन बेशुद्ध पडले होते. याप्रकरणी आळेफाटा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे कामी सरकारी पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता अनुप ल. लखोटीया यांनी सहा साक्षीदार, वैद्यकीय अहवाल तसेच जप्त मुद्देमाल न्यायालयासमोर सादर केला. साक्षीदारांची साक्ष आणि वैद्यकीय पुरावे ग्राह्य धरून न्यायालयाने दोन्ही आरोपींना भारतीय दंड संहितेच्या कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सहकलम ३४ अंतर्गत दोषी ठरविले.

# सासवडला गौराईंपुढे वाढते आहे देखाव्याची परंपरा





**■ सासवड (दै. संध्या)**

गणेशोत्सवा पाठोपाठ गुरुवारी गौराईंचे सर्वत्र उत्साही आगमन झाले आहे. सासवड शहरात अनेक घरातून गौराईंपुढे समाजप्रबोधनपर, पौराणिक, पर्यावरण संदेश देणारे व अन्य आकर्षक देखावे उभारण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. घरातील महिला, मुली या निमित्ताने आपल्या कल्पकतेला वाव देत असल्याचे दिसून येत आहे. सध्या सर्वत्र डीजे बंदिचा विषय चांगलाच चर्चेत आहे त्याला अनुसरून सासवड येथील डॉ भाग्यश्री प्रशांत बोरावके यांनी डी जे मुळे सर्वसामान्यांना होणारा त्रास व डीजे बंदी यावर सुरेख देखावा उभारला आहे. सासवडच्या दिपाली संतोष जगताप यांनी पुस्तकांची आकर्षक मांडणी करत महर्षी व्यास यांनी सांगितलेली व गणपती यांनी लिहलेले महाभारत या विषयावर देखावा मांडला आहे. माधुरी जगदीशचंद्र शिंदे यांनी गणेश व गौराई यांचा नौका विहार सुंदरपणे उभा केला आहे. सोपानदेव मंदिराच्या परिसरातील भारती संजय चव्हाण व चैतन्य चव्हाण यांनी आकर्षकरित्या शिवालयाची मांडणी केली आहे. याच भागातील अंजली व अश्विनी सोळसकर यांनी दरवर्षीची देखाव्याची परंपरा या वर्षीही कायम ठेवली आहे. त्यांनी पाटण तालुक्यातील दाते गडावरील प्रताप मारुती ची उभारणी केली आहे. सोळंकी टॉवर्स मधील दीपा प्रदीप कुलकर्णी आणि सोपाननगरातील सिद्धी संदीप जगताप यांनी साधेपणाने आरास केली आहे. शुक्रवारी सायंकाळी या सणाच्या निमित्ताने महिलांच्या हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाची सर्वत्र मोठ्या प्रमाणावर लगबग दिसून आली.






## 'वेदनेतून नेतृत्व'! लोणी भापकरच्या भापकर कुटुंबीयांचा गौरी-गणपतीतून अजितदादांच्या आठवणींना उजाळा



**■ बारामती (दै. संध्या)**

> ■ जिरायती भाग बागायती करण्याचे अजित पवारांचे स्वप्न; सुनेत्रा पवार हे स्वप्न पूर्ण करणार का?

बारामती तालुक्यातील लोणी भापकर या गावातील रहिवाशी जयदीप सुभाष भापकर यांनी आपल्या घरची १०० वर्षा अधिक पासून असलेली गौरी गणपती ची परंपरा जपत असताना.... उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अपघाती निधन झाल्याने या भापकर कुटुंबांनी " वेदनेतून नेतृत्व असा देखावा तयार केला आहे."यात त्यांनी अजित पवार हे मुम्बई येथून निघाले आणि अपघात झाला,आणि त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली या दरम्यान त्यांच्यावर झालेली टीका टिपण्णी, आणि महाराष्ट्र राज्यासाठी त्यांनी घेतलेला पुढाकार या बाबतची संपूर्ण माहिती देत त्यांनी देखावा उभारला आहे.

महत्वाचे हे कुटुंब जिरायती भागातील लोणी भापकर येथील असल्याने त्यांनी अजित पवार यांचे स्वप्न होते की मला माझा जिरायती भाग बागायती बनवायचा आहे तसेच त्यांनी अनेक सभेतील भाषणातून त्यांनी हे वक्तव्य केले असल्याने .. त्यांचे हे स्वप्न उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार पूर्ण करतील का? असा महत्वाचा उद्देश आहे.

## तांदूळवाडीत 'श्री गणेशा आरोग्याचा' अभियानांतर्गत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**■ बारामती (दै. संध्या)**



महाराष्ट्र शासनाचा उपक्रम मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांच्या समन्वयाने राबविण्यात येत असलेल्या 'श्री गणेशा आरोग्याचा' या आरोग्य अभियानांतर्गत १७ सप्टेंबर रोजी तांदूळवाडी येथील शिवनगर गणेश मंडळाच्या वतीने सामुदायिक आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये शासकीय महिला ग्रामीण रुग्णालय,बारामती येथील तज्ज्ञ डॉक्टरांनी परिसरातील नागरिकांची विविध आजारांसाठी तपासणी केली.यावेळी रोगनिदान, आवश्यक शस्त्रक्रियांसाठी मार्गदर्शन,रक्त तपासणी,ईसीजी तसेच इतर विविध वैद्यकीय तपासण्या मोफत करण्यात आल्या.तपासणीनंतर गरजेनुसार नागरिकांना औषधांचे वाटपही करण्यात आले. या उपक्रमादरम्यान नागरिकांना आयुष्मान भारत कार्ड मोफत काढून देण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली.त्यामुळे परिसरातील नागरिकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शशिबिरात १५० हून अधिक नागरिकांनी सहभाग घेऊन आरोग्य तपासणी करून घेतली. यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ.श्री.बापू भोई,डॉ.मयूर बेलदार, श्री. पंढरी करणे,सौ.जाई साळी, श्री.राहुल नक्कावार,सौ.योगिता गडदरे,रियाज शेख,डॉ.घुले सर, श्री.महेश खोपडे यांच्यासह शिवनगर कला क्रीडा प्रतिष्ठान गणेशोत्सव मंडळाचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

## एआयच्या मदतीने बनावट वाघाचा फोटो

**■ तळेगाव ढमढेरे (दै. संध्या)**

शिरुर तालुक्यात अनेक ठिकाणी बिबट्यांचा वावर असल्याचे फोटो व व्हिडीओ सध्या प्रसारित होत आहेत. कोंढापुरीत एका युवकाने चक्क वाघाचा फोटो बनवून गावात वाघ आल्याची अफवा पसरवल्याची घटना समोर आली आहे. शिरुर वनविभागाकडून अफवा पसरवणाऱ्या युवकाचा शोध घेण्यात आला आहे. कोंढापुरी गावात वाघ आल्याबाबतचा फोटो सोशल मीडियावर प्रसारित झाल्याचे समोर आल्यानंतर शिरुर वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांनी अफवा पसरवणाऱ्या युवकाचा शोध घेण्यासाठी मोहीम राबवली. वनपरीमंडळ अधिकारी रुपावली जगताप, नियतक्षेत्र वनअधिकारी पूनम जाधव, सोपान अनासुने, रेस्क्यू टीमचे वैभव निकाळजे, शेरखान शेख, श्रीकांत भाडळे, राहुल गायकवाड यांनी कोंढापुरी परिसरात अफवा पसरवणाऱ्या युवकाचा शोध घेत स्थानिक नागरिकांच्या उपस्थितीत मोबाईलची तपासणी केली असता सदर युवकाने मोबाईलमध्ये ए आय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सदर वाघाचा फोटो बनवून गावामध्ये प्रसारित करत अफवा पसरवल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर युवकाने त्याबाबत कबुली देखील दिल्याने वनविभागाकडून युवकाचा जबाब नोंदवत त्याला समज देण्यात आली आहे. नागरिकांनी अशा प्रकारच्या अफवा पसरवू नये असे आवाहन वनविभागाच्या वतीने करण्यात आले आहे. कोंढापुरी येथे वाघ आल्याबाबतचे फोटो प्रसारित करणाऱ्याला समज देण्यात आलेली असून, कोणी विनाकारण वन्यप्राण्यांबाबत अफवा पसरवत असेल तर थेट गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे शिरुर वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांनी सांगितले.

## नीरा येथे गौरी आगमनाचा उत्साह



**■ नीरा (दै. संध्या)**

गणरायाच्या आगमनानंतर आता गौरीचेही नीरा परिसरात मोठ्या उत्साहात आगमन झाले असून, घराघरांत गौरीची आकर्षक सजावट करण्यात आली आहे. काल आणि आज गौरीचे देखावे पाहण्यासाठी नीरा परिसरातील नागरिक, विशेषतः महिलांची मोठी गर्दी होत आहे. पारंपरिक पद्धतीने गौरीचे स्वागत करताना विविध कुटुंबांनी कल्पकतेने आरास आणि देखावे साकारले आहेत. नीरा परिसरातील प्रभाग क्रमांक दोनमधील संगीता शिंदे आणि शिंदे कुटुंबीयांनी साकारलेला शिव-पार्वती विवाह सोहळ्याचा देखावा विशेष आकर्षण ठरत आहे. शिव-पार्वती विवाहाची प्रतिकृती, आकर्षक सजावट आणि पारंपरिक वातावरणाची निर्मिती यामुळे हा देखावा पाहण्यासाठी महिलांची विशेष गर्दी होत आहे. याचबरोबर नीरा येथील साळुंखे कुटुंबातील गार्गी साळुंखे आणि कुटुंबीयांनी साकारलेला श्रीकृष्ण जीवनचरित्राचा देखावा देखील लक्षवेधी ठरला आहे. श्रीकृष्णाच्या जीवनातील विविध प्रसंग सजावटीच्या माध्यमातून मांडण्यात आल्याने हा देखावा नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे. नीरा परिसरातील अनेक कुटुंबांनी आपल्या घरात गौरीचे विधिवत स्वागत करून फुलांची सजावट, आकर्षक विद्युत रोषणाई, पारंपरिक वस्तू आणि विविध धार्मिक देखाव्यांच्या माध्यमातून गौरीची आरास केली आहे. काल सायंकाळपासून आज सायंकाळपर्यंत तसेच उद्या सकाळपर्यंत गौरीचे दर्शन, सजावट पाहण्यासाठी आणि हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमासाठी महिला एकमेकींच्या घरी भेटी देत आहेत. त्यामुळे नीरा परिसरात सध्या गौरी उत्सवाचा आनंद आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

## महावितरणच्या कार्यकारी संचालकपदी कावळे, पाटील, मिश्रा, काकडे रूजू

**■ मुंबई(दै. संध्या)**



अंकुर कावळे · संदीप पाटील · चंद्रमणी मिश्रा · सुनील काकडे

महावितरणच्या प्रादेशिक संचालक / कार्यकारी संचालकपदी प्रतिनियुक्तीच्या भरती प्रक्रियेतून निवड झाल्यानंतर श्री. अंकुर कावळे, श्री. संदीप पाटील, श्री. चंद्रमणी मिश्रा व श्री. सुनील काकडे यांनी नुकताच कार्यभार स्वीकारला. नवनियुक्त कार्यकारी संचालक याआधी महावितरणमध्ये मुख्य अभियंता म्हणून विविध ठिकाणी कार्यरत होते.

कार्यकारी संचालक श्री. अंकुर कावळे याआधी मुख्यालयात मुख्य अभियंता (वितरण) म्हणून कार्यरत होते. त्यांनी विद्युत अभियांत्रिकीमध्ये पदव्युत्तर पदवी आणि व्यवस्थापन क्षेत्रातील पदव्युत्तर पदविका संपादन केली आहे. सन १९९७ मध्ये सहायक अभियंता म्हणून श्री. कावळे तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये रूजू झाले. पदोन्नतींनंतर त्यांनी नाशिक, अहिल्यानगर, पुणे, कोल्हापूर येथे विविध पदांवर काम केले आहे. सन २०२५ पासून ते मुख्य अभियंता म्हणून मुंबई मुख्यालयात कार्यरत होते.

कार्यकारी संचालक श्री. संदीप पाटील यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी संपादन केली असून सन २००३ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात ते सहायक अभियंता म्हणून रूजू झाले. सन २००९ मध्ये त्यांची थेट भरतीमध्ये कार्यकारी अभियंतापदी निवड झाली. सन २०१८ मध्ये अधीक्षक अभियंतापदी तर सन २०२५ मध्ये त्यांची मुख्य अभियंता म्हणून पदोन्नती झाली. श्री. संदीप पाटील हे मुख्य अभियंता (वीज खरेदी) म्हणून मुख्यालयात कार्यरत होते.

कार्यकारी संचालक श्री. चंद्रमणी मिश्रा यांनी विद्युत अभियांत्रिकीची पदवी विशेष प्रावीण्यासह संपादन केली आहे. सन २००३ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात ते सहायक अभियंता म्हणून रूजू झाले. त्यानंतर पदोन्नतींवर त्यांनी अलिबाग, वाशी, छत्रपती संभाजीनगर, मुंबई येथे काम केले आहे.

सन २००९ मध्ये त्यांची थेट भरतीमध्ये कार्यकारी अभियंता म्हणून निवड झाली. तर सन २०१८ मध्ये अधीक्षक अभियंता म्हणून तर सन २०२४ मुख्य अभियंतापदी पदोन्नतीने झाली. श्री. मिश्रा कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते.

कार्यकारी संचालक श्री. सुनील काकडे यांनी विद्युत अभियांत्रिकीची पदवी संपादन केली असून १९९७ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये ते सहायक अभियंता म्हणून रूजू झाले.

त्यानंतर विविध पदांवर त्यांनी चाळीसगाव, नाशिक, भुसावळ, छत्रपती संभाजीनगर, कल्याण, अहिल्यानगर, भांडूप येथे काम केले. श्री. काकडे यांची सन २०२२ मध्ये मुख्य अभियंतापदी पदोन्नती झाली. भांडूप परिमंडलानंतर सन २०२५ पासून श्री. सुनील काकडे पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते.